# छात्र प्रबोधन

सौर आषाढ, शके १९३३ । वर्ष ११ अंक १०


मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !











छात्र प्रबोधनद्वारा
साहस सहली!
क्षणचित्रे!!
युवकांची
राजगड-तोरणा
युवतींची
लोहगड-तिकोणा

# छात्र प्रबोधन

**सौर आषाढ, शके १९३३। वर्ष ११ अंक १०**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२)

२२८ वा अंक, वर्ष १९ अंक १२


*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## अंतरंग


२. संवाद - महेन्द्र सेठिया

३. व्यक्तिपरिचय... जीवन ज्यांना कळले हो ! - डॉ. माधवी वैद्य

६. कविता पानोपानी... ही प्रगती? - रमेश कोटस्थाने

आजीसंगे... - आश्लेषा महाजन

७. चित्रपट परिचय... बोल्ट - प्रसाद सांडभोर

९. प्रकल्पाची कमाल, शिकण्यातली धमाल - २

विविध प्रकारचे प्रकल्प करूया ! - डॉ. नलिनी गुजराथी

१३. कर्मयोगिनी भगिनी निवेदिता - ९ - डॉ. सुरुचि पांडे

१५. कथा... सदाशिवाचे अग्निकांड - अनु. वसुधा पंडित

२०. ललित... पाऊस माझ्या घनातला... - दत्ता हलसगीकर

२३. ललित... याला 'जेवण' ऐसे नाव ! - डॉ. संगीता बर्वे

२५. ललित... माझा सायकल प्रवास... - शिवराज पिंपुडे

२८. प्रकल्प-स्पर्धा निवेदन

३०. ज...जोडीकार्याचा !

मलपृष्ठ पद्य - तनूमनात... - हेमाताई अंतरकर

**याशिवाय -** करूया नवं काही - दीपमाळ (२७)


वनस्पतिशास्त्रातल्या जाणकार, निवृत्त प्राध्यापिका **डॉ. कांचनगंगा गंधे** आणि प्रसिद्ध साहित्यिक **आश्लेषा महाजन** यांचा 'छात्र प्रबोधन'च्या संपादक मंडळात समावेश झाल्याचा विशेष आनंद होतो आहे. त्यांचे मन:पूर्वक स्वागत !

**मुखपृष्ठाविषयी -** जलरंग आणि पेस्टलरंग या दोहोंचा वापर या चित्रात केला आहे. आधी जलरंगात चित्र पूर्ण करून त्यावर पेस्टलरंगाने पावसाचा परिणाम साधला आहे. विविध रंगांच्या छटांचा सुंदर मिलाफ या चित्रातून दिसून येतो. पावसात भिजणाऱ्या सिंहगडाचे हे विलोभनीय दृष्य चितारले आहे.

**- भास्कर सगर**


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**अतिथी कार्यकारी संपादक**
शिल्पा कुलकर्णी

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख
नीलिमा करमरकर
कांचनगंगा गंधे
आश्लेषा महाजन
दत्ता श्री. टोळ

**मुखपृष्ठ/मलपृष्ठ**
भास्कर सगर/अभय पुरंदरे

**आतील चित्रे**
अभय पुरंदरे, सौरभ उपळेकर, साहिल उपळेकर



**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९


**ई-मेल**
jpchhatra@rediffmail.com

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org



**वार्षिक वर्गणी ₹ १८०/-**
**द्वैवार्षिक - ₹ ३४०/-**
**त्रैवार्षिक ₹ ५००/-**
**दशवार्षिक - ₹ १,५००/-**
**या अंकाची किंमत : ₹ १५**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४०जादा

## संवाद



***अनुभवसंपन्न होऊ इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,***

*सुट्टीमधल्या साहस सहलींमध्ये खूपच धमाल आली. महाराष्ट्रभरातून ४४ मुलामुलींनी यात सहभाग घेतला. मुलांची रायगड - तोरणा सहल कडक उन्हाळ्यात झाली, तर मुलींची लोहगड-तिकोणा सहल गच्च पावसात ! करवंदं-जांभळं-गावरान आंबे अशा रानमेव्याचा मनसोक्त आस्वाद घेत घेत केलेली भटकंती ! हजारो काजव्यांनी लगडलेली, नैसर्गिक रोषणाई केलेली १५-२० झाडे बघताना तर भान हरखूनच गेलं. सलग ५-७-१० तास चालणं, जंगलातलं चुकणं, आसमंत दणाणून सोडणाऱ्या घोषणा नि स्फूर्तिगीते आणि शांत-धीरगंभीर वातावरणात झालेली उपासना अन् करुणाष्टके... ठिकठिकाणी चुलींवर केलेला 'स्वयं'पाक अन् प्रवासात ग्रामस्थांबरोबर झालेल्या गप्पा-गोष्टी, किल्ल्यांवर हिंडताना ऐकलेला इतिहास आणि तिथल्या वास्तू पाहाताना चढलेलं स्फुरण, पायी चालत-चालत झालेल्या मनमोकळ्या गप्पा आणि त्यातून फुलत जाणारी मैत्री अशा सगळ्या गोष्टींनी या सहली सर्वांच्याच दीर्घकाल लक्षात राहतील. गंमत म्हणजे या सहलीहून घरी परत गेल्यानंतर सर्वांना सहलीत बरोबर घेतलेल्या कोणत्याही एका वस्तूचे (सॅक, टोपी बूट इ.) आत्मवृत्त लिहायला सांगितले होते. आत्मवृत्त लिहिताना सर्वांनीच सहलीचे अनुभव पुन्हा-पुन्हा आठवले. तुम्हीही सुट्टीत जिथे कुठे प्रवासाला गेला असाल त्याचे वर्णन अशा एखादया वस्तूच्या आत्मवृत्ताच्या रूपात लिहू शकाल का? सहलीतली काही क्षणचित्रे रंगीत पानांवर पाहालच. दिवाळीच्या सुट्टीत १५० कि.मी.ची सायकल सहल आहे, येणार का? पण त्यासाठी तुम्हाला जोडीकार्याच्या योजनेत सहभागी व्हायला हवं. या योजनेविषयी आणि या सुट्टीत काही मुलामुलींनी केलेल्या जोडीकार्यबद्दलचे अनुभव (पृष्ठ क्र. ३०, ३१, ३२) जरुर वाचा.*

*मागच्या महिन्यापासून 'प्रकल्पांची कमाल, शिकण्यातली धमाल' ही लेखमाला आपण सुरू केलीये. या अंकात याबद्दलची स्पर्धाही जाहीर केली आहे. खरंतर तुम्ही सर्वजण गेली २-३ वर्षे शाळेमध्ये प्रकल्प करतच असाल. कधी विज्ञान प्रकल्प स्पर्धेत/प्रदर्शनात भागही घेतला असेल. पण बहुतांशी वेळा असं लक्षात येतं की त्यातल्या बऱ्याचशा प्रकल्पांमध्ये कशाचा संग्रह तरी केलेला असतो अथवा कसली तरी प्रतिकृती तरी केलेली असते. खरंतर,* ***प्रकल्प करणं म्हणजे 'प्रश्न पडणं' आणि मग त्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी शास्त्रशुद्ध पद्धती वापरून स्वत:चा स्वत:च केलेला कृतियुक्त अभ्यास करणं !*** *हा अभ्यास कसा करायचा हे सांगण्यासाठी अंकातली ही लेखमाला! पाश्चात्त्य अन् प्रगत देशांमधल्या शिक्षण पद्धतीतलं वैशिष्ट्य असं की तेथे अगदी लहान वयापासून विद्यार्थी स्वत: असे प्रकल्प करत करतच शिकतात. शिक्षक केवळ मदती करताच ! 'छात्र प्रबोधन'च्या वाचकांनी शिकण्याची ही पद्धत लवकरात लवकर आत्मसात करावी असं मनापासून वाटतं. यासाठी त्यातल्या अनेकांनी या प्रकल्प-स्पर्धेत सहभागी व्हायला हवं. छान-भन्नाट प्रश्न पडतच नसतील तर तुमच्या सारख्याच काही मुलामुलींना पडलेल्या प्रश्नांमधून काही निवडक प्रश्न प्रकल्प स्पर्धेसाठी विषय म्हणून दिले आहेत. तुम्हाला काही वेगळे प्रश्न पडले असतील तर त्यावरही तुम्ही प्रकल्प करू शकता. फक्त दूरभाष करून संमती घ्या.*

*या स्पर्धेत सहभागी होणाऱ्यांना अंकातून/प्रकल्प विशेषांकातून तर मार्गदर्शन मिळेलच शिवाय काही तज्ज्ञ व्यक्तींचे नियमित मार्गदर्शनही उपलब्ध असेल. तर अशा वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमात आठवी ते दहावीच्या प्रबोधकांनी आवर्जून सहभागी व्हावं.*

*असे अनुभवांमधून, स्वत:चं स्वत: शिकत, समृद्ध होत असतानाच आपल्या शिकण्यामध्ये ज्यांचं ज्यांचं योगदान आहे अशा सर्वांबद्दल मनामध्ये आदराची, कृतज्ञतेची, नम्रतेची भावना सतत असायलाच हवी. ती व्यक्त करण्याचं एक निमित्त म्हणजे गुरुपौर्णिमा! तुमच्या शाळेत/घरात तुम्ही तुमच्या मनातली कृतज्ञता कशी व्यक्त करता? कळवाल ! पावसात डोंगरभटकंतीला अन् भातलावणीला जाताय ना !*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**



**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, येरवडा, पुणे ६**

# जीवन ज्यांना कळले हो!

**डॉ. माधवी वैद्य**




**आपल्या सगळ्यांच्याच जडणघडणीत थोरा-मोठ्यांचं मोलाचं योगदान असतं. त्यांच्या शिकवण्याने त्यांच्या आपुलकीच्या ओलाव्याने,कधी नकळत संस्कार देण्याने आपलं व्यक्तिमत्त्व समृद्ध होत असतं. अशा थोरांविषयी प्रत्येकाच्या मनात कृतज्ञता सतत जागी असते. गुरुपौर्णिमेच्या दिवशी गुरूंविषयीचा आदर व्यक्त करण्याची आपली परंपरा आहे. या लेखात डॉ. माधवी वैद्य यांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व घडवणाऱ्या काही थोरा-मोठ्यांबद्दलची कृतज्ञता रसाळ भाषेत व्यक्त केली आहे.**

मी फार भाग्यवान आहे. माझ्या आयुष्यात माझ्या कुटुंबातील आणि समाजातील अनेक व्यक्ती अशा आल्या की, ज्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाकडे बघून त्यांच्यासमोर मान आपोआपच नतमस्तक व्हावी. या सर्व व्यक्ती खरं तर माझ्या अवतीभवतीच होत्या. त्यांचा सहवास, त्यांच्याबरोबर घालवलेले काही क्षण मला आपोआपच श्रीमंत करून गेले. आज मी जी आहे, ती या साऱ्यांच्यामुळेच आहे; असे निश्चितपणे म्हणावेसे वाटते. या व्यक्तींमध्ये माझ्या घरातीलही काही व्यक्ती आहेत. माझे वडील कै. भा. नी. पटवर्धन- साताराचे सुप्रसिद्ध वकील. टिळकांची केस चालवायला गेलेले कै. दादासाहेब करंदीकर हे त्यांचे आजोबा (त्यांच्या आईचे वडील). आजोबांच्या करड्या शिस्तीत माझे वडील वाढले.

साताराचे शनिवारातील आमचे घर तेव्हा 'प्रतिष्ठित' म्हणून लौकिक पावलेले! म्हणजे सातारमध्ये आलेली प्रत्येक व्यक्ती तेव्हा घरी आल्याशिवाय राहात नसे. त्यामुळे खूप प्रतिष्ठित नेते, कलावंत, गायक, लेखक, वादक यांचा घरी राबता असायचा. बाबा नऊ वर्षांचे असताना त्यांनी संगीत श्रेष्ठ मंजीखाँ आणि पद्मा शाळिग्रामची साथ केली होती. पुढे त्यांनी बालगंधर्वांना ऑर्गनची साथ केली. 'शो मस्ट गो ऑन' हा कानमंत्र मला माझ्या वडिलांनी शिकवला. 'आपला हात 'भविष्य' जाणून घेण्यासाठी कोणालाही दाखवू नये. मात्र परिस्थितीशी दोन हात करण्यासाठी मनगटात बळ कमवावे' असे ते सांगत. तसेच आपल्या अवती भवती वावरणाऱ्या आपल्या नातेवाईकांवर काही आणीबाणी आल्यास त्यांच्या पिलांना आपल्या पंखाखाली ऊब मिळाली पाहिजे आणि डोक्यावर छप्परही !' हा आदर्श त्यांनी आपल्या कृतीतून आमच्यापुढे ठेवला.

माझी एक आजी म्हणजेच माझ्या आईची आत्या, तिने आईचा आणि आईच्या भावंडांचा सांभाळ केला. त्यांना पोरकेपणा भासू दिला नाही. या आजीची एक आठवण अजूनही मनात घर करून आहे. माझी आई लहान असताना आईला आणि आत्याच्या मुलीला दोघींनाही टॉयफाईड झाला होता. त्या काळी या रोगाला फार भीत असत आणि जपतही असत; या रोगावर तेव्हा खात्रीलायक उपचार नव्हते. माणसे दगावायची. तशीच आत्याची लेकही दगावली. माझी आई आणि या आत्याची लेक दोघींना शेजार-शेजारच्या खोलीत ठेवले



**प्रधान मास्तर**

होते. आपली लेक दगावली त्याचा धसका आपल्या भाचीने घेऊ नये म्हणून तिने आपल्या मुलीची निधन वार्ता आपल्या भाचीला कळूही दिली नाही. तिच्या मुलीला मागच्या दारातून अंत्यविधीसाठी गुपचूप नेण्यात आले. 'जे माणूस गेले आहे, ते परत येणार नाही; पण जे या रोगातून वाचण्याची शक्यता आहे, त्याला कसे वाचवू शकू, ते बघूयात', असा तिचा प्रेमळ सल्ला सर्व घरादाराने शिरोधार्य मानला. माझी आई म्हणजेच तिची भाची वाचली. माझ्या आईनेही तिच्या आयुष्यात आईविना पोरक्या झालेल्या मुलांना अशीच मायेची ऊब दिली.

ही डोंगराएवढ्या उंचीची माणसे माझ्याच घरात मला लाभली. त्यांची उदात्त विचारसरणी, निस्पृहता बघत-बघत आम्ही 'वाढत' होतो. चांगले 'माणूस' होण्याचे शिक्षण आपल्या घरातूनच जिवंत उदाहरणाद्वारे आपल्याला मिळत असते. फक्त त्यासाठी 'टिपकागदी' वृत्ती हवी. चांगले बघण्याची, ऐकण्याची आणि अनुभवण्याची मनात इच्छा हवी. त्यासाठी आपल्या मनाची कवाडे उघडी असायला हवीत. आपल्या सभोवती दिसणारे चांगले संस्कार टिपण्याची क्षमता हवी.

एका व्यक्तीमध्ये सर्व उत्तमोत्तम गुण एकवटलेले नसतात. असे झाले तर तो पुरुषोत्तम भगवंत गणला जाईल. प्रत्येक व्यक्तीत काहीतरी चांगले तत्त्व असते. हे जाणून घेऊन ते तत्व आपल्यामध्ये कसे रुजवता येईल, याकडे लक्ष देणे म्हणजे स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करणे होय. ज्याप्रमाणे माझ्या घरातच अशी 'मोठी' व्यक्तिमत्त्वं मला लाभली तशीच समाजातही माझ्या भाग्याने अशा अतिशय उंच व्यक्ती भेटल्या. त्यांच्या उंचीपुढे आपले खुजेपण वारंवार जाणवते.

प्रधान मास्तर ही एक अशीच व्यक्ती. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचले. आयुष्याच्या उत्तरार्धात हडपसरला जाऊन वानप्रस्थाश्रमाचा अनुभव त्यांनी घेतला. स्वत:शी प्रामाणिक राहाणे, ही गोष्ट खरंतर सर्वांत कठीण असते असे मला वाटते. आपण इतरांना फसवू शकतो; पण स्वत:ला नाही फसवता येत. असे स्वत:शी प्रामाणिक असणारे प्रधान मास्तर त्यांपैकी एक होत. मला ते आपली मुलगी मानत असत. मला याचीही कल्पना आहे की, त्यांच्या या वात्सल्यभावाचा अनुभव माझ्यासारख्याच अनेक जणींना आला असेल. त्यामुळे प्रधान मास्तर हे आपल्याला मुलगी मानतात; ही मिरवण्याची नव्हे तर कुपीत ठेवलेल्या अत्तरासारखी, जपण्याची गोष्ट वाटते.

आज या लेखाच्या निमित्ताने मी हे बोलते आहे. पंधरा पंधरा दिवसांनी प्रधान मास्तरांचा क्षेम कुशल विचारण्यासाठी फोन यायचा. 'कशी आहेस गं? ठीक आहेस ना ? जपून राहा !' हे त्यांचे मायेचे बोल आजही स्मरतात. आजही फोन खणाणला की वाटते, प्रधान मास्तरांचा फोन असेल, असावा; पण ते आता अशक्यच ! आपण खूप केलेले असतानाही 'अग, काहीच केले नाही मी ! अजून खूप करायला हवे होते; पण हातून या जन्मी तरी इतकेच झाले. जास्त नाही करता आले,' असं ते निखळपणे म्हणत. आपले राहाते घरही 'साधना'ला समर्पित करून लांब जाऊन व्रतस्थ वृत्तीने राहणारे प्रधान सर आजही डोळ्यांसमोरून हलत नाहीत. ते हडपसरला राहात होते त्या खोलीत अगदीच मोजक्या वस्तू त्यांनी ठेवल्या होत्या. लिहिण्यासाठी एक टेबल-खुर्ची, एक गोदरेज कपाट, त्यात मोजकेच कपडे, झोपायला एक खाट, बरीचशी पुस्तके, लिहिण्यासाठी कागद आणि पेन. अशी असंग्रही वृत्ती क्वचितच आढळते. त्यांच्याकडे बघून शंभरदा मनात येई बोरकरांच्या 'जीवन त्यांना कळले हो' या ओळी यांना बघूनच लिहिल्या असाव्यात का?

दुसरी अशीच राजस, मानवतावादी व्यक्ती म्हणजे



प्रा. - व्ही. व्ही. आर्किटेक्ट्स, प्रा. लि. पुणे

कविश्रेष्ठ कुसुमाग्रज. कुसुमाग्रजांची कविता अनेकांना माहीत आहे; पण कुसुमाग्रजांनी सात आदिवासी पाड्यांतून, वस्तींतून, त्या माणसांच्या आरोग्यासाठी, शिक्षणासाठी केलेले काम किती जणांना माहीत आहे? कुसुमाग्रजांनी म्हणजेच तात्यासाहेबांनी या माणसांना 'माणूस' म्हणून जगण्यासाठी प्रसिद्धी पराङ्‌मुख राहून कार्य केले. हे त्यांचे कार्य त्यांच्या मानवतावादी दृष्टिकोनाच्याच खुणा आहेत. या लोकांच्या शिक्षणाची सोय त्यांनी बघितली. त्यांच्यासाठी वाचनालये सुरू केली. आदिवासी वस्त्यातून वैद्यकीय सेवा - सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते जातीने लक्ष पुरवीत असत. 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चे नाशिकमधील काम त्यांच्या दक्ष नजरेखाली फुलून आले होते. साऱ्या नाशिकचीच सांस्कृतिक पातळी उंचावण्याचे श्रेय या महाकवीला द्यावे लागेल. नारायण सुर्वे यांना आपले मानसपुत्र मानून, आपले गोत्र त्यांना बहाल केले 'असा महामानव,' आपल्या सहवासाने अनेकांना श्रीमंत करून गेला. अशा प्रकारची श्रीमंती चिरंतन असते. या प्राप्त झालेल्या श्रीमंतीला चोरीला जाण्याची भीती नसते. ती अक्षय असते. तिचा प्रसाद ज्यांच्या वाट्याला आला ते मोठे भाग्यवान ! त्या भाग्यवंतांपैकी आपण एक आहोत याचं समाधान ते काय वर्णावं ! ते ज्यांना लाभलं त्यांनाच त्याची महती कळावी. स्वत:चे 'मी' पण पक्व फळासारखे गळून जाणे म्हणजे काय याचे जिवंत उदाहरण म्हणजे कविश्रेष्ठ कुसुमाग्रज !

माझ्या आयुष्यातील आणखी एक भाग्ययोग म्हणजे अमरावतीच्या डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांचे फारच जवळून दर्शन मला लाभले. त्यांची मुलगी श्रीमती अनुताई भागवत ही माझी मामी. किंबहुना संस्कारांच्या दृष्टीने बोलायचे तर माझी 'ममी.' मी आज जी काही आहे, ती तिच्या प्रभावामुळे - संस्कारांमुळे आहे; अशी माझी श्रद्धा आहे. तिच्यामुळे मला तिच्या ऋषितुल्य पित्याचा म्हणजेच डॉ. शिवाजीराव पटवर्धनांचा सहवास लाभला. अगदी त्यांच्या आयुष्यातल्या अखेरच्या प्रायोपवेशन (अन्नत्याग करून प्राण सोडणे) पर्वाच्या वेळीही त्यांच्या जवळ मला काही दिवस राहता आले. 'प्रखर गांधीवादी व्यक्ती म्हणजे काय,' याचा ते आदर्श नमुना होते. आपले तन, मन, धन एखाद्या कार्याला अर्पण करणे



**कुसुमाग्रज**

म्हणजे काय? त्यागी वृत्ती असणे म्हणजे काय? प्रामाणिकपणा म्हणजे काय? 'स्व'ला विसरून काम करणे म्हणजे काय? या साऱ्यांचे उत्तर 'डॉ. शिवाजीराव पटवर्धन' हे एकच यावे, अशी संपूर्णत: आदर्शवत अशी ती व्यक्ती होती. इतकी पराकोटीची त्यागी वृत्ती मी माझ्या आयुष्यात आजवर बघितलेली नाही. अत्यंत राजबिंडे, करारी, दिव्य -भव्य व्यक्तिमत्त्व. त्या व्यक्तिमत्त्वातील विलक्षण ठामपणा आणि आपल्या तत्त्वांना न सोडण्याची दुर्दम्य धडाडी सारेच अवर्णनीय !

'जगदंबे! मला पुढचा जन्म महारोग्याचाच दे ! म्हणजे या जन्मातली माझ्या कर्तव्यात राहिलेली कसूर तेव्हा भरून काढता येईल,' अशी त्या जगन्नियंत्या शक्तीला त्यांनी घातलेली साद आजही मनात घुमते आहे.

अशा अलौकिक व्यक्तींचा सहवास काही क्षणांपुरता लाभला तरी आपल्या आयुष्यातील त्या क्षणांचे सोने झाले असे वाटावे ! अशा व्यक्ती भेटल्यावर व त्यांचा सहवास लाभल्यावर 'जीवन ज्यांना कळले हो , 'मी'पण ज्यांचे पक्व फळापरी गळले हो !' असे वाटल्यावाचून राहात नाही.

अशा आणखीही कितीतरी व्यक्ती असतील; ज्यांनी आपले जीवन देशाला, संस्थेला, आपल्या माणसांसाठी मन:पूर्वक समर्पित केले. त्या सगळ्यांच्या प्रती एकच भाव मनात दाटून येतो, 'दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथे कर माझे जुळती ! कर माझे जुळती !'

***

**- डॉ. माधवी वैद्य**
'जनार्दन', फ्लॅट नं. ५२,
स्वेदगंगा सोसायटी, वारजे, पुणे 411058


कविता पानोपानी

## ही प्रगती?

निळ्या आभाळी - पक्षी विहरती
हिरवी नक्षी - काळी धरती.
कवितेमधली दृश्ये असली
कविकल्पना भासे नकली ।

इथे प्रदूषण गोंधळ गर्दी
दमट हवेतच घामट सर्दी
धूर धुळीने काळे अंबर
रस्त्यावरती खडी न् डांबर

इंद्रधनुचे रंग हरपले
तेज तारकांचे हरपले
आकाशातील नक्षत्रांना
कायमचे जणू ग्रहण लागले



दगडविटांच्या जंगलामध्ये
हिंसक वाहने गर्जत जाती
रस्तोरस्ती गति-रोधक
सिग्नल प्रगति रोखुनि धरती

कसली किलबिल कसली खळबळ?
यांत्रिक जगणे रोज धावपळ
अशा प्रगतिने काय साधले?
सौख्य शांती ना केवळ तगमग !

**रमेश कोटस्थान**
४५, शांती, स्टेट बँक कॉलनी,
नौपाडा, ठाणे (प.) 400602

## आजीसंगे...



जुन्यापुराण्या फोटोंमधुनी, पाहात होती आजी हसुनी
लुगड्यावरच्या जरतारीची, नक्षी सुंदर दिसली खुलुनी

गोंदण हिरवे हिरवे सुंदर, कपाळावरी चंद्र टपोरा
खोप्यावरती ताजा गजरा, कुळवंतिण ती ! मिरवी तोरा

घेऊन गेला फोटो मजला आठवणींच्या गावाला मग
आजीसंगे बागडलेले, भूतकाळचे साकारे जग

लपाछपीला पदराखाली, बाळ होऊनी निजुनी गेलो
गप्पागोष्टींमधुन पोसलो, मोठा-थोडा शहाणा झालो

तहानलाडू भूकलाडूचे घास भरवले प्रेमभराने
आजही तोंडा सुटले पाणी, गोड गोड त्या आठवणीने

भांडणतंटा आणि अबोला, कितीक जखमा, रुसवे-दंगे
निभावलो मी, सावरलो मी, केवळ ह्या आजीच्या संगे

....आजी नाही आज घडीला... तरी सदोदित असते सोबत
आठवणी अन् स्वप्नांमधुनी, करितो आम्ही गंमत-जंमत


**- आश्लेषा महाजन**
'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसा., सहकारनगर - १, पुणे ९
ashleshamahajan@rediffmail.com


**प्रा. - श्री. अजित भिडे (इव्हेंट मॅनेजर) पुणे**

चित्रपट परिचय

# ‘बोल्ट’

प्रसाद सांडभोर




तुम्हाला ‘बोल्ट’ माहीत आहे...? ...तोच तो - लुकलुकत्या डोळ्यांचा, पांढराशुभ्र अमेरिकन व्हाईट शेफर्ड कुत्रा... नव्हे महाकुत्रा - सुपरडॉग! त्याच्या पोटावरचा तो विजेच्या लोळासारखा काळा पट्टा? त्याच्या त्या अद्‌भूत शक्ती-सुपरबार्क, सुपरस्टेप, मेल्टव्हिजन... आणि त्याची ती लहानगी प्रेमळ मालकीण पेनी? ठाऊक नाही म्हणता? अहो असं कसं काय? शहरांमध्ये जिकडे तिकडे त्याचीच पोस्टर्स लागली आहेत.

नोव्हेंबर २००८ साली प्रदर्शित झालेला ‘बोल्ट’ हा वॉल्ट डिस्ने पिक्चर्सचा अठ्ठेचाळिसावा ॲनिमेशनपट; या सुपरडॉग बोल्टची कहाणी पेश करतो...

गोष्टीची सुरुवात होते ती हॉलिवूडमध्ये. स्टुडिओ नाईटमध्ये ‘बोल्ट’ मालिकेच्या नव्या भागाचे चित्रीकरण चालू आहे. पेनी आणि बोल्ट (नेहमीप्रमाणे) गुंडांशी दोन हात करून पोलिसांना मदत करतात. दृश्य छान जमूनदेखील दिग्दर्शकसाहेब सगळ्या हाताखालच्या मंडळींना फैलावर घेतात. म्हणे चित्रीकरणादरम्यान कोणत्यातरी कॅमेऱ्याचा माईक बोल्टला दिसू शकला असता. दिग्दर्शकसाहेब चांगलेच भडकले आहेत. तुम्ही म्हणाल, ‘‘हा काय विचित्रपणा?’’

अहो, हे दिग्दर्शकसाहेब आहेतच असे विचित्र. त्यांनी बोल्टला, तो अगदी पिल्लू असताना विकत घेतलंय. त्याला प्रशिक्षण दिलंय. त्याच्यासाठी खास (मोठमोठ्या कलाकारांकडे असते तशी) ‘व्हॅनिटी व्हॅन’ही तैनात केली आहे. बोल्टला एवढ्या सुखसोयी कशासाठी? तर चित्रीकरण नसतानासुद्धा बोल्टचा वावर ‘सुपरडॉग’ म्हणूनच व्हावा, असे दिग्दर्शक साहेबांना वाटे. त्यामुळे पडद्यावरचा बोल्टचा अभिनय शक्य तेवढा नैसर्गिक, ‘जिवंत’ होण्यास मदत होईल, असे त्यांचे मत! या सगळ्या चंदेरी दिखाव्यामध्ये बिचाऱ्या बोल्टचं मात्र ‘खऱ्या’ जगापासूनचं नातं तुटलंय... दुर्दैवाची गोष्ट म्हणजे बोल्टला या प्रकारची बिलकूल जाणीव नाहीये...

तर असा हा टीव्हीवरचा सुपरडॉग बोल्ट एकदा चुकून त्याच्या सुरक्षित व्हॅनमधून बाहेर पडतो आणि थेट न्यूयॉर्कला जाऊन पोहोचतो! आपण स्टुडिओबाहेरच्या - ‘खऱ्या’ जगात आहोत हे त्याला समजत नाही. त्याने तसे ‘खरे जग’ कधी पाहिलेलेच नसते मुळी! चित्रपटातल्या हिरव्या डोळ्यांच्या खलनायकाचाच हा एक कुटील डाव आहे असं मानून बोल्ट पेनीच्या- आपल्या मालकिणीच्या शोधार्थ न्यूयॉर्कमधून निघतो. न्यूयॉर्क ते हॉलिवूडपर्यंतचा (पर्यायाने कल्पनेपासून वास्तवापर्यंतचा) बोल्टचा प्रवास म्हणजेच हा चित्रपट - बोल्ट.

अर्थात या प्रवासात बोल्ट एकटाच नाही दाखवलेला; सर्वप्रथम त्याला भेटते मिटन्स-घाऱ्या डोळ्यांची काळी हडकुळी मांजर. न्यूयॉर्कच्या एका गल्लीतली गुंडीण! आसपासच्या बऱ्याच छोट्या-मोठ्या प्राण्यांवर तिचा दरारा आहे. त्यांच्यावर हुकूम गाजवत ती आयतं पोट भरतेय. दिसते तशीच मतलबी स्वभावाची आहे ती. आपल्या ‘सच्चाई का रखवाला’ बोल्टच्या अगदी उलट!

बोल्ट त्याच्या गैरसमजामुळे मिटन्सला खलनायकाची खबरी समजतो. आणि तिला बेड्या ठोकून शोधमोहिमेचा श्रीगणेशा करतो. जीव वाचवण्यासाठी मिटन्स बोल्टचे वेडे चाळे कशीबशी सहन करते खरी... परंतु हळूहळू तिला बोल्टची कीव येऊ लागते. रक्त म्हणजे काय? त्याची आपल्याला काय गरज? भूक म्हणजे काय? पोटासाठी अन्न कसं मिळायचं? वेदना म्हणजे काय? अशा बऱ्याच प्राथमिक गोष्टी ती बोल्टला शिकवते... कधी रडत-चिडत, तर कधी त्याच्या बाळबोध प्रश्नांवर हसत खिदळत...

प्रवासादरम्यान ओहियो शहरातल्या मुक्कामी या द्वयीला


शोधा... http://brainyquot.com






**बोल्ट ॲनिमेशनपटातील दृश्य**

भेटतो - ऱ्हायनो द हॅमस्टर (उंदराच्या जातकुळीतला पाळीव प्राणी). ऱ्हायनोने बोल्टचा प्रत्येक भाग (एपिसोड) अगदी टीव्हीला डोळे लावून पाहिलाय. बोल्ट त्याचा सर्वात आवडता सुपरहिरो आहे. त्याला प्रत्यक्ष पाहताना ऱ्हायनो कृतकृत्य होतो आणि लागेल ती मदत करण्याचे वचन देतो.

इथून पुढे या तीन तऱ्हेच्या तीन जणांची एकत्र 'सफर' सुरू होते... कधी बस, कधी ट्रक, कधी फर्निचरची गाडी, तर कधी चक्क आगगाडीच्या टपावरून... जे वाहन मिळेल त्यातून लपत - छपत या त्रिकूटाला 'इंटर स्टेट हायवे' पार करायचाय. दरम्यान एकामागून एक संकटे-अडचणी त्यांच्यावर आदळण्याठी तयार आहेत. लास वेगासजवळ तिघांची होणारी ताटातूट, एकमेकांना वाचवण्यासाठी स्वत:चा जीव धोक्यात घालणं... हे सगळे क्षण प्रत्यक्ष सिनेमातच अनुभवणे योग्य ! विशेषत: मिटन्स बोल्टला दीनवाणा चेहेरा (डॉगफेस) कसा करावा हे शिकवते ते दृश्य... बोल्टच्या चेहऱ्यावरील सूक्ष्म हालचाली त्यात झकास टिपल्या आहेत.

कथानक क्षणभरही उसंत घेत नाही. हायवेवरच्या वाहनांप्रमाणे ते कायम वेगात पुढे सरकते. आधी म्हटलं तसं, प्रवासादरम्यान परिस्थितीचे चटके-धक्के शब्दश: सहन करत असताना बोल्टला 'खऱ्या जगा'ची ओळख होते. 'एक सामान्य कुत्रा' असण्याचे वास्तव स्वीकारताना त्याला खूप जड जाते. एव्हाना त्याचे दोस्त बनलेले मिटन्स आणि ऱ्हायनो त्याला वेळोवेळी उभारी देतात... आणि मग त्याच्या पोटावर रंगवलेल्या खुणेप्रमाणेच त्याचे 'सुपरडॉगपण'ही रस्त्यावर उडणाऱ्या धुराळ्यात हळूहळू विरून जाते...

नेव्हाडाच्या वाळवंटात मिटन्स 'पुढे कशाला जायचं? इथेच राहू,' असं सुचवते. 'पेनीला वाचवण्यासाठी' म्हणून सुरू केलेल्या प्रवासाला आता खरंच काही अर्थ उरलेला नसतो.

हे सगळं काल्पनिक आहे तर...

पण मग पेनीची बोल्टवरची माया, प्रेम, ते खरं असेल का? पेनीसुद्धा अचानक नाहीशा झालेल्या बोल्टला भेटण्यासाठी त्याच्या इतकीच व्याकूळ झाली असेल का? यांची उत्तरं बोल्ट कशी मिळवतो? तो पेनीपर्यंत -हॉलिवूडला पोहोचतो की नाही? हे जाणून घेण्यासाठी तुम्ही 'बोल्ट' पाहायलाच हवा.

संपूर्ण चित्रपटात 'थ्री-डी सीजीआय' तंत्रज्ञान वापरून डिस्नेनं हा एक उत्कृष्ट ॲनिमेशनपट बनवलाय. बोल्टच्या धावपळीची, पडापडीची दृश्यं आपल्याला बसल्याजागी खिळवून ठेवतात. मिटन्स, ऱ्हायनो आणि बोल्ट ही त्रयी आपल्याला कधी हसवते, रडवते, कधी विचार करायला लावते. माणूस आणि पाळीव प्राण्यांच्या विश्वातील मायेच्या नात्यांचे धागे हा चित्रपट अलगदपणे उलगडून दाखवतो. शहाण्णव मिनिटांच्या या चित्रपटाला आवाज दिलाय जॉन ट्रॅव्होल्टा, मायली सायरस आणि सूझी इसमन यांनी. त्यावर्षीच्या उत्कृष्ट ॲनिमेशनपटासाठीचे ऑस्कर नामांकन या चित्रपटाला मिळाले होते.

काय मग? अशी ही खऱ्या नायकाची कहाणी तुम्ही आवर्जून पाहणार ना? तसेच तुम्ही पाहिलेल्या आणि तुम्हाला आवडलेल्या चित्रपटांबद्दल आम्हाला जरूर लिहून पाठवा.

***

**– प्रसाद सांडभोर**
१३ ए, विजयश्री सोसायटी,
महेश विद्यालयाजवळ, कोथरुड, पुणे 411038
sandbhorprasad@gmail.com


**प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

लेखमाला

(२)

प्रकल्पांची कमाल
शिकण्यातली धमाल



# विविध प्रकारचे प्रकल्प करूया !

डॉ. नलिनी गुजराथी

**'प्रकल्पाची कमाल, शिकण्यातली धमाल' या लेखमालेतील पहिला लेख सौर ज्येष्ठच्या अंकात तुम्ही जरूर वाचला असेल. आम्हाला खात्री आहे, या लेखमालेतील लेख वाचता वाचता तुम्ही 'प्रकल्पमय' होऊन जाणार आहात. नवनवीन विषयांवर प्रकल्प करण्यासाठी तुम्ही एकदम तयार होणार आहात. मागील अंकातील प्रकल्प स्पर्धेचे निवेदन वाचून त्यात सहभागी होण्यासाठी SMS येऊ लागले आहेत. तुम्हीही 'प्रकल्प स्पर्धेत' सहभागी व्हायचेच असं ठरवून SMS करताय ना? स्पर्धेचे स्वरूप, विषय, अधिक माहितीसाठी स्पर्धेचे निवेदन असलेले पान क्र. २८-२९ जरूर पाहा.**

वडगावच्या सरस्वती माध्यमिक विद्यालयाचे यंदा दहावे वर्ष होते. त्यानिमित्त योजलेल्या प्रकल्प प्रदर्शनात सर्व विषयांचे प्रकल्प मांडण्यात येणार होते. नववीच्या वर्गातही प्रकल्पांचे विषय काढण्यासाठी मुलांची डोकी कामाला लागली. इ. नववीचा वर्ग हा अतिउत्साही वर्ग होता. त्यांच्या वर्गाध्यापिका सौ. अश्विनीताई यापण मुलांच्या कल्पनांना प्रोत्साहन देणाऱ्या होत्या! अश्विनीताईंनी आज नववीच्या तासाला मुलांच्या प्रकल्पांच्या कल्पना ऐकून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याचं ठरवलं होतं. त्यांनी एकेकाला आपल्या कल्पना मांडायला सांगितल्या.

स्नेहानं सुरुवात केली, 'बाई, आमचं गावात शेत आहे. यंदा बाबांनी शेतात औषधी वनस्पती लावायचं ठरवलं आहे. त्यामुळे औषधी वनस्पतींच्या बिया, फुलं, फळं, खोड, मुळं असे वेगवेगळे औषधी उपयोगाचे भाग मी जमा करणार आहे. आयुर्वेदातील पुस्तकातून या वनस्पतींची माहितीपण मी मिळवणार आहे !'

''फारच छान!'' अश्विनीताई पुढे म्हणाल्या, ''स्नेहाने हा **संग्रहात्मक प्रकल्प** निवडलाय ! अशा प्रकारे आणखी कुणी काही वेगळा संग्रह करायचं ठरवलय का?''

४ -५ हात लगेच वर झाले. नितीन म्हणाला,

''मी स्फटिकांचा, दगडांचा संग्रह करणार आहे ! स्मिता म्हणाली ''मला आपले भाषा विषयच आवडतात ! मी आईवरील सर्व कविता एकत्र करून त्यांचा संग्रह करणार आहे !'

संजय म्हणाला, ''मी संस्कृत सुभाषितांचा संग्रह करणार आहे !''

अश्विनीताई हे सर्व ऐकून म्हणाल्या, ''बघा ! किती वेगवेगळ्या विषयातील संग्रह तयार होतील आपल्याकडे ! पण या वस्तू किंवा ठरवलेले घटक जमा करण्यासाठी तुम्हीपण नेटानं अनेक ठिकाणी हिंडून शोध घ्यायला हवा. वस्तूंचा नुसता संग्रह करून उपयोगाचं नाही. त्या घटकांचं वर्गीकरण करून त्या वस्तू नीट लावायला हव्यात ! त्यांची वैशिष्ट्ये, त्यांचे उपयोग काय आहेत, याची माहिती घेऊन तशी नोंद करायला हवी. तुमचा संग्रह माहितीपूर्ण, उद्‌बोधक आणि वैशिष्ट्यपूर्ण व्हायला हवा !''

एवढ्यात अशोक उठून म्हणाला, ''बाई आपल्या गावात रामनदी वाहते. तिच्यावर एक छोटं धरण बांधलंय !



दिनविशेष :३ जुलै - जागतिक वनसंवर्धन दिन

त्या धरणाचं **मॉडेल** बनविणार आहे मी ! माझे वडील तिथंच इंजिनिअर म्हणून कामाला आहेत. त्यांना विचारून माहिती काढेन मी !''

''हे बघ, वडिलांना माहिती विचारायला हरकत नाही; पण मॉडेल तूच तयार करायला हवंस ! वडिलांनीच जर सगळं करून दिलं तर तू काय शिकणार त्यातून? प्रमाण कसं घ्यायचं? कोणतं साहित्य वापरायचं? म्हणजे पुठ्ठा, थर्मोकोल किंवा दगड हे सगळं तू ठरवायचंस !'' इति अश्विनीताई.

अशोकचाच मित्र सुबोध लगेच म्हणाला, ''बाई, मला यात थोडी भर टाकायचीय ! अशोकला हे मॉडेल 'वर्किंग मॉडेल' म्हणून सुद्धा बनवता येईल ! नदीचं वाहतं पाणी, धरणाचे दरवाजे उघडणं - त्यातून पाणी खाली पडणं - दरवाजे बंद होणं अशा अनेक क्रिया दाखविता येतील !''

''कृती दाखविणारं मॉडेल करणं तर अजूनच चांगलं! वाटल्यास त्यासाठी दोघा - तिघांचा गरजेनुसार गट केलात तरी चालेल. बरं आणखी कोणी वेगळं मॉडेल बनविणार आहे का?'' अश्विनीताईंनी विचारलं.

सागर म्हणाला ''मी ग्रहमालेचं मॉडेल तयार करीन. ग्रह फिरताना दाखवीन. ग्रहणं कशी होतात ते दाखवीन. पृथ्वीवरचे दिवस - रात्र, ऋतू कसे होतात ते दाखवीन''.

आकाश म्हणाला, ''मला अवकाशयानाचं मॉडेल बनवायचं आहे ! मी अमेरिकेतलं नासा केंद्र बघायला गेलो होतो, त्यामुळे मला हेच प्रोजेक्ट करायचंय !''

''यापेक्षा वेगळा प्रकल्प कुणाला सुचलाय का?'' अश्विनीताई.

''बाई, मला वेगवेगळ्या फुलांपासून अत्तर बनवायचंय! गुलाब, मोगरा, चाफा, जाई अशा फुलांचा अर्क काढून मी अत्तर तयार करणार! त्यासाठी अत्तराचा कारखाना बघायला जायचीपण माझी तयारी आहे,'' मृण्मयी म्हणाली.

''ए मृण्मयी, तुझ्या नावातच मृद् म्हणजे माती हा शब्द आहे, मग तू मातीचंच अत्तर तयार करून दाखव ना! परवाच्या वळवाच्या पावसानंतर काय घमघमाट सुटला होता मातीचा !'' निखिलनं तिला डिवचलं.

''ए बाबा, असल्या सुपीक कल्पना तुझ्याच डोक्यातून निघणार! सांगायला सोपंय पण करायचं कसं?'' मृण्मयी.

''अरे असा वाद घालू नका ! ही कल्पना खरंच छान आहे ! यात काहीतरी नावीन्यसुद्धा आहे ! यात खरा नवनिर्मितीचा आनंद मिळेल आपल्याला. आपण जरा धडपड करायला हवी ! कॉलेजच्या प्राध्यापकांकडून, विद्यापीठातील संशोधकांकडून, इंटरनेटवरूनदेखील माहिती काढता येईल. आणि समजा नाहीच बनवता आलं मातीचं अत्तर तरी आपण त्यासाठी जे प्रयोग करू, धडपड करू ती तर इतरांसमोर येईलच ना ! असे **नवनिर्मितीचे प्रकल्प** प्रत्येक विषयात करायलाच हवेत. भाषा विषयातही स्वतः केलेल्या कविता, स्वतःला सुचलेल्या कल्पनेतून लिहिलेल्या कथा, नाटिका, स्वरचित निबंध, लघुनिबंध इ. नवनिर्मितीची उदाहरणं सांगता येतील. पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, ग. दि. माडगूळकर, आचार्य अत्रे हे अशा नवनिर्मितीमुळेच प्रतिभावंत लेखक म्हणून गाजले !''

अत्तराची कल्पना सुचल्यानंतर अनेकांना अनेक पदार्थ, वस्तू बनविण्याच्या कल्पना भराभर सुचू लागल्या. साबण, शांपू, भांड्यांची पावडर, निसर्गातील घटकांपासून तयार केलेले रंग, हातकागद, टूथपेस्ट, उदबत्ती, डासांना / माशांना पळवून लावणारी उदबत्ती... कल्पनेला पंख फुटू लागले. कुणाला दुर्बीण बनवायची होती. त्यासाठी 'आयुका'त जायचं होतं, कुणाला सूक्ष्मदर्शक (मायक्रोस्कोप) बनवायचा होता तर कुणाला शोभादर्शक (कॅलिडोस्कोप) बनवायचा होता. मुलांच्या उत्साहाला जरा थांबवत अश्विनीताई म्हणाल्या,

''हे बघा; पण कुठलीही नवनिर्मिती म्हणजे तयार होणारी प्रत्येक वस्तू किंवा पदार्थ उत्तम गुणवत्तेचाच हवा. ज्या गोष्टी पूर्वी इतरांनी तयार केल्या त्याच तुम्ही बनविल्यात तर त्यात नवीन ते काय? तुम्ही स्वतःची भर त्यात काय टाकलीत, हे माझ्या दृष्टीनं महत्त्वाचं ! जसं - हातकागदामध्ये केळ्याच्या, संत्र्याच्या, मोसंब्याच्या सालींपासून हातकागद बनविता येईल का? आणखी कोण-कोणत्या वस्तूंपासून बनविता येईल? डाळीच्या फोलपटापासून? भाताच्या तुसापासून? जरा एकत्र बसून करा की, कल्पना विस्फोट !

आता प्रकल्पाच्या कल्पनांना अधिकाधिक खोली येऊ लागली होती ! इतका वेळ गप्प असलेली माधवी म्हणाली,


**प्रायो. - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली**

''माझं हिमोग्लोबिन कमी आहे ते वाढवायला हवं. त्यासाठी आयर्नचं प्रमाण जास्त असलेले पदार्थ खायला हवेत असं डॉक्टर म्हणाले. त्यावरून मला कल्पना सुचली की, वेगवेगळ्या भाज्या, फळे यातील आयर्नचं प्रमाण शोधून काढायचं. उदा. पालक, मेथी, कोथिंबिर, खजूर, गूळ इ.''

''तुझी कल्पना छानच आहे ! अशा प्रकल्पांना **विश्लेषणात्मक प्रकल्प** असं नाव दिलं आहे. त्यासाठी तुला रसायनशास्त्राच्या पुस्तकांमधून आयर्नचं प्रमाण शोधण्यासंबंधीची माहिती काढावी लागेल. ते साहित्य जमवावं लागेल. मग तुला हे निश्चित करता येईल की कशात आयर्न जास्त आहे ते !'' अश्विनीताई.

''मग असं तर कितीतरी घटकांचं विश्लेषण करता येईल की ! अंड्याच्या टरफलात कॅल्शियम किती? किंवा जास्त ॲसिडिक कोण? लिंबू, संत्रे, मोसंबे की चिंच? कोणता डिटर्जन्ट सगळ्यात चांगला सर्फ, व्हील की टाईड? मिठाच्या वेगवेगळ्या प्रकारात आयोडिनचं प्रमाण किती? मॅग्नेशियमचं प्रमाण किती?'' अनिलच्या डोक्यातून कल्पनांचा धबधबाच उसळू लागला !

वाचनाचं वेड असलेली सुनीता म्हणाली, ''विश्लेषण फक्त शास्त्रातच करता येतं असं थोडंच आहे? ते भाषेतही करता येईल ! मराठी साहित्यात स्त्री लेखिकांचं योगदान किती आहे? कुसुमाग्रजांच्या कवितांची वैशिष्ट्ये काय आहेत?

स्त्रियांची बाजू मांडणाऱ्या कवितांमधील मला आवडलेल्या कवितांचं जर मी रसग्रहण लिहिलं, समीक्षा केली तर तोही विश्लेषणात्मकच प्रकल्प होईल !''

सुनीताची ही समज, प्रगल्भता पाहून अश्विनीताई थक्कच झाल्या ! 'आपण समजतो त्यापेक्षा ही मुलं खूप विचार करतात तर !' त्या म्हणाल्या,

''शास्त्रविषयातील प्रकल्पांना आपण विश्लेषणात्मक प्रकल्प म्हणतो तर भाषाविषयातील प्रकल्पांना **रसग्रहणात्मक किंवा समीक्षात्मक प्रकल्प** म्हणतो. या दोन्हीत थोडासा फरक आहे. रसग्रहणात आपण साहित्यामुळे निर्माण होणाऱ्या रसाचा आस्वाद घेत असतो. त्यामुळे निर्माण होणाऱ्या भावनांची दखल घेत असतो. शैलीचा विचार करत असतो. असे अजून वेगळे प्रकल्प कुणाला सुचतायत का?''



अजित म्हणाला, ''मी पेपरच्या बातम्या नियमितपणे वाचतो. त्यात वेगवेगळ्या विषयातील सर्वेक्षणाचे अहवाल वाचण्यात येतात ! पुण्यातील २५ शाळांतील मुलांचं सर्वेक्षण केलं, त्यात मुलांमध्ये लठ्ठपणाचं प्रमाण वाढत चाललंय असं आढळलं. पुणे विद्यापीठातील मुलींच्या रक्ताची तपासणी केली तेव्हा शहरी मुलींमध्ये रक्तक्षय वाढतोय असं आढळलं. त्यावरून मलापण असा **सर्वेक्षणाचा प्रकल्प** करावासा वाटतोय ! आपल्या वडगावात किती मुलांना चष्मा लागलाय? किती घरांना शौचालये आहेत? प्राथमिक शाळेत मुलामुलींचं गळतीचं प्रमाण किती आहे? चौथी पास झालेल्या किती मुलामुलींना मराठी नीट वाचता येतं? असे

अनेक विषय मला सुचताहेत! पण त्यासाठी सँपल प्रश्नावली कशी तयार करायची?''

अश्विनीताई उत्तरल्या, ''तू छानच विषय सुचवले आहेस. तुला पडलेले प्रश्नही महत्त्वाचे आहेत. गावातील सर्व मुलामुलींचं, सर्व घरांचं, सर्व लोकसंख्येचं सर्वेक्षण करणं खर्चिक, वेळखाऊ आहे. मर्यादित स्वरूपाचं 'सँपल' तुला त्यासाठी निवडावे लागेल ! प्रश्नावलीतील प्रश्न नेमके पाहिजेत, मोघम नकोत. त्यातील शब्दरचना सोपी, समजणारी हवी. प्रश्न प्रकार ठरवायला हवा. हो / नाही या धर्तीचा, बहुपर्यायी, रिकाम्या जागा भरा, एका वाक्यात उत्तरे द्या इ. अनेक प्रकारांतून प्रश्न तयार करायला हवेत! मुख्य म्हणजे प्रश्नावलीतील प्रश्न विचारल्यावर आपण निवडलेल्या समस्येमागील कारणे लक्षात यायला मदत होईल.''इतक्यात तेजस म्हणाला,

''बाई, तुम्हाला माहितीच आहे की मला वेगवेगळे प्रयोग करून बघायला आवडतं ! नुकतंच मी जगदीशचंद्रांचं चरित्र वाचलं. त्यावरून झाडांवर प्रयोग करून बघायची माझी इच्छा आहे. वनस्पतींच्या वाढीवर संगीताचा परिणाम कसा होतो? हा प्रकल्प मला करायचा आहे. त्यासाठी मी एखाद्या वनस्पतीच्या १०० बिया घेईन. त्यांचे ५० - ५० चे दोन गट करीन. दोन्ही गटांसाठी खत, माती, पाणी, प्रकाश इ. वाढीसाठी आवश्यक सर्व घटक सारखेच ठेवीन. फक्त एका गटाला संगीत ऐकवणार. समजा दिवसातून दोन तास! दुसऱ्या गटाला अजिबात संगीत ऐकवणार नाही. दोन्ही गटांचे महिनाभर निरीक्षण करेन. दोन्ही रोपांची उंची किती वाढली, रोपाला पाने किती फुटली इ. मग दोन्ही गटांच्या निरीक्षणांची तुलना करून निष्कर्ष काढेन !'' त्याचा प्रकल्प ऐकून अश्विनीताई खूष झाल्या.

''अरे वा ! तेजस तुझी तर सगळीच तयारी झाली आहे. बरं का मुलांनो, या प्रकारच्या प्रकल्पांना **प्रायोगिक प्रकल्प** म्हणतात. ज्यामध्ये आपण एखादं गृहीतक - जसं 'संगीताचा झाडाच्या वाढीवर परिणाम होईल' हे गृहीतक मांडून त्याआधारे प्रयोग करतो; मांडलेलं गृहीतक बरोबर की चूक ते ठरवतो. आपण ते तपासून पाहतो. त्यासाठी प्रायोगिक आणि नियंत्रित असे सँपलचे दोन गट करतो. संगीत एवढा एकच घटक (व्हेरिएबल) सोडून इतर सर्व घटक सारखेच नियंत्रित करून निरीक्षणे करतो. त्यामुळे आपण निवडलेल्या घटकाचा (Independent Variable) उदा. संगीताचा, झाडाच्या वाढीवर (Dependent Variable) निश्चितपणे काय परिणाम होतो हे नियंत्रित गटाशी तुलना करून निश्चितपणे सांगता येतं ! सर्व शास्त्रज्ञ याच पद्धतीने संशोधन करीत असतात. आपल्यापुढील विविध समस्यांची उत्तरे ते याच शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करून शोधत असतात ! अजून असे प्रायोगिक प्रकल्प कुणाला सुचताहेत का?''

अमित- ''सीएफएल ट्यूबमुळे खरंच ऊर्जा बचत होते का, हे तपासता येईल.''

जया, ''नियमित बदाम खाल्ल्याने बुद्धी किंवा प्राणायाम करण्याने स्मरणशक्ती वाढते का हे पाहता येईल!'' सुमेधा, ''लंबकाचा आंदोलन काल कोणकोणत्या घटकांवर अवलंबून असतो ते शोधून काढता येईल.''

तास संपल्याची घंटा वाजल्यामुळे अश्विनीताईंनी या चर्चेचा समारोप केला. त्या म्हणाल्या, ''आज तुम्ही सांगितलेल्या कल्पनांमधून प्रकल्पांचे सहा प्रकार आपल्या ध्यानात आले. संग्रह, मॉडेल्स्, वस्तू / पदार्थ निर्मिती, वस्तू / पदार्थांतील घटकांचे विश्लेषण, सर्वेक्षण आणि प्रायोगिक प्रकल्प ! आपण भोवतालच्या परिसराचे सूक्ष्म निरीक्षण केले तर आपल्याला अनेक प्रश्न पडतात. त्यातून आपल्याला अडचणी, समस्या जाणवू लागतात. त्या सोडविण्याच्या दृष्टीने मनात कल्पना स्फुरू लागल्या की, प्रकल्पाचा विषय सापडतोच आणि चिकाटीने या कल्पना प्रत्यक्षात आणायची धडपड केली की, प्रकल्प साकारतोच!

मला माहिती आहे, या सगळ्या तुम्ही सुचवलेल्या विषयांवर नेमके काय करायचे याविषयी काही शंका असतील. पण त्या सर्व शंकांवर पुढच्या तासांमध्ये आपण चर्चा करू. यंदा आपल्या शाळेचे दशकपूर्तीचे वर्ष आहे. तेव्हा आपल्या वर्गाचे प्रकल्प उत्तम होणारच याची मला आजच खात्री पटली आहे.''

***

**- डॉ. नलिनी गुजराथी**
१२७७, शुक्रवार पेठ, सुभाषनगर,
गल्ली क्र. ५, पुणे 411002
nalini@prabodh.com



**पान प्रायोजक - अमर परांजपे, सांगली**

कर्मयोगिनी
भगिनी निवेदिता
लेखांक – ९



# निवेदिता आणि भारतीय स्वातंत्र्य

डॉ. सुरुचि पांडे

युरोपमधील दुसऱ्या मुक्कामात निवेदिता भारतात येऊन कोणती कामे करायची याचे चिंतन करत होत्या. त्यावेळी या कार्याचे क्षेत्र अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने त्यांच्या विचारांची दिशा हळूहळू ठरू लागली. भारताचं राजकीय स्वातंत्र्य भारताच्या विकासासाठी गरजेचं आहे, याची निकड त्यांना अधिक जाणवू लागली. अर्थात रामकृष्ण मठाशी संपर्क राखून आपल्याला स्वातंत्र्य चळवळीत उतरता येणार नाही, हेही त्यांना ठाऊक होतं. स्वामी विवेकानंदांनी रामकृष्ण मठाच्या नियमावलीत स्पष्टपणे म्हटले होते की, 'मठाचे कार्य आध्यात्मिक व मानवतेच्या पायावर उभारलेले असल्याने राजकारणाशी त्याचा कसलाही संबंध येणार नाही.' निवेदिता म्हणत, ''मी हिंदू आहे हे जितकं खरं आहे तितकंच हिंदुस्थानचे राजकीय प्रश्न निकडीचे आहेत हेही खरं आहे.''

हळूहळू निवेदितांचा राजकीय कार्यात, तत्कालिन राजकीय पक्षांशी संपर्क वाढू लागला. रामकृष्ण मठाच्या कार्यास आपल्या राजकीय कार्यामुळे झळ पोहोचू नये असे त्यांना वाटे. १९ जुलै १९०२ रोजी 'अमृत बझार पत्रिके'तून निवेदितांनी जाहीर केलं की, यापुढे त्यांचे राजकीय कार्य हे बेलूर मठाच्या (म्हणजे रामकृष्ण मठांचे प्रमुख केंद्र असलेल्या शाखेच्या) अधिकाराच्या आणि मान्यतेच्या कक्षेबाहेर स्वतंत्रपणे केले जाईल. औपचारिकरित्या जरी निवेदितांनी रामकृष्ण संघाशी संबंध तोडले असले तरी संघातील साऱ्यांना त्या जवळच्याच स्नेही वाटत राहिल्या.

भारताच्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक समस्यांवर निवेदितांनी अतिशय मूलगामी लिखाण केलेले आहे. राष्ट्रीयता या संकल्पनेवरचा त्यांचा लेख भारतातील प्रत्येक नागरिकानं वाचावा असाच आहे. 'नॅशनॅलिटी' (राष्ट्रीयता) या लेखाच्या सुरुवातीला त्या म्हणतात, 'आज राष्ट्रीयता म्हणताना कोणत्या गोष्टी वगळल्या पाहिजेत, हे मी आधी सांगणार आहे. या देशात मतांची भिन्नता आहे, भिन्न भाव-भावना आहेत. केवळ या कारणांखातर जिथं लोक एकमेकांच्या जिवावर उठतात, तिथं राष्ट्रीयता कधीच असू शकत नाही. येथे सामाजिक सुधारणा करू इच्छिणारे कर्मठ विचारसरणीच्या व्यक्तीवर हल्ला करतात; त्याचबरोबर कर्मठ विचारवंत सुधारकांशी भांडणं करत असतात. शिकलेली व्यासंगी माणसं शिक्षणतज्ज्ञ लोकांचे दोष दाखवतात आणि शिक्षणतज्ज्ञ म्हणवली जाणारी माणसंही सुशिक्षित वर्गाला नावं ठेवतात. एखाद्या समाजात जर अशी परिस्थिती असेल तर अशा समाजाला राष्ट्रबांधणीचा पहिला धडादेखील समजलेला नाही, असंच म्हणावं लागेल...

'राष्ट्रीयता' काय असते, ते एका शब्दात सांगता येत नसतं. सर्व विभिन्न चळवळी आणि विभिन्न संस्था जरी वेगवेगळ्या पद्धतीनं कामं करत असल्या तरी साऱ्यांचं उद्दिष्ट मात्र एकच असलं पाहिजे. आणि ते म्हणजे राष्ट्राचं कल्याण. असा कृतार्थ दिवस जोवर येत नाही तोवर एकमेकांचे क्षुल्लक दोष काढण्यात आपण आपली ऊर्जा वाया कशाला घालवायची? असं करून कडेला उभी असलेली बघे मंडळी तिरस्कारपूर्वक हसतात, म्हणून आपणच भान राखलं पाहिजे... राष्ट्राच्या हितासाठी एकसंध फळी असल्याप्रमाणे आपण राहिलं पाहिजे. मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगते की, इथं कोलकत्यात जी युरोपीय मंडळी राहात आहेत त्यांच्यात एकमेकांबद्दल एवढी असूया आणि शत्रुत्वाची भावना असेल; ती कदाचित तुमच्यातल्यापेक्षाही जास्त तीव्र असू शकेल; पण तुम्हाला कधी त्या असूयेचं रूप बाह्यत: जाणवलं तरी आहे का?

परकीयांच्या नजरेपासून आपापसातील अंतर्गत विसंवाद युरोपीय माणसं फार काळजीपूर्वक दडवून ठेवतात; त्यामुळेच ते सारे एकसंध समूह म्हणून पुढं येतात.

तुम्ही भारतीय लोक व्यक्तिगत पातळीवर असलेल्या भक्तिभावाबाबत अतिशय सशक्त आहात. आपले आई-वडील, बंधू, मित्र यांच्याखातर तुम्ही सर्वस्व पणाला लावू शकता. युरोपीय लोकांना अद्यापि तुमच्याकडून शिकण्यासारखा हा धडा नक्की आहे. एखादा युरोपीय माणूस जेव्हा काम करतो तेव्हा त्याच्या सहकाऱ्याबरोबर तो एकोप्यानं काम करतो. कदाचित व्यक्तिगत पातळीवर ती सहकारी व्यक्ती त्याला आवडतही नसेल, परंतु पक्षाच्या किंवा संस्थेच्या हिताखातर ते एकमेकांशी जुळवून घेतात. एखाद्या (सामाजिक) आदर्शाच्या, सदाचाराच्या खातर स्वत:च्या अहंकाराला पुसून टाकण्याची कला भारतीय माणसाला शिकायची गरज आहे... '('राष्ट्रीयता' विषयावर निवेदितांनी १४ ऑगस्ट १९०४ रोजी कोलकता येथे 'द डॉन सोसायटी'मध्ये व्याख्यान दिले होते.)

निवेदितांनी राजकीय क्षेत्रात सक्रिय कामास सुरुवात करण्याआधी भारताचा दौरा करण्याचं ठरवलं. नागपूर, मुंबई येथे त्यांची व्याख्यानं जनतेला फार आवडली. पश्चिम भारताची सफर करताना त्या समाजाच्या स्थितीचा आढावा घेत होत्या. नंतर त्या बडोद्याला गेल्या. बडोद्यात महत्त्वाची घटना घडली, ती म्हणजे निवदिता आणि योगी अरविंद यांची झालेली भेट. सयाजीराव गायकवाड या लोकहितदक्ष राजेसाहेबांशीही निवेदितांची भेट झाली. अहमदाबादला जाऊन मग त्या पुन्हा मुंबईला आल्या. तिथं त्यांनी कान्हेरीची लेणी पाहिली. नंतर दौलताबादहून त्या वेरूळला गेल्या. वेरूळच्या गंभीर, चिंतनशील शिल्पकलेचा त्यांच्या मनावर मोठाच प्रभाव पडला.

दक्षिण भारतातही निवेदितांना निमंत्रण होते. स्वामी सदानंदांना सोबतीला घेऊन निवेदिता मद्रासला जायला निघाल्या. स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधू असलेल्या स्वामी रामकृष्णनंदांनी मद्रास प्रांतात रामकृष्ण - विवेकानंद विचारांचा मोठा प्रसार करण्याचे कार्य केलेले होते. त्यांच्या सहवासात आलेल्या विद्यार्थ्यांनी 'विवेकानंद सोसायटी' स्थापन करून त्याच्या विविध ठिकाणी शाखा चालवलेल्या होत्या. अशा युवकांना निवेदिता आवर्जून भेटल्या. युवकांशी चर्चा केल्या. नंतर त्या कांजीवरमला व्याख्यानासाठी जाऊन आल्या. १९०४ सालात त्यांनी पाटणा व लखनौचा दौरा केला. प्रवासाच्या दरम्यान, व्याख्यानांचं वेळापत्रक सांभाळत निवेदितांनी राजगीर, नालंदा, बुद्धगया, बनारस येथेही भेट दिली.

इ. स. १९०० ते १९०५ या काळात भारतातील सुशिक्षित जनतेनं कॉंग्रेसमार्फत आपला आवाज उठवायला सुरुवात केलेली होती. ब्रिटीश सरकार भारतातील शिक्षणपद्धतीत शिरकाव करून आपली सत्ता बळकट करून घेऊ लागली. १९०४ मध्ये 'युनिव्हर्सिटीज ॲक्ट' नावाचा कायदा करण्यात आला. त्याबाबत व लॉर्ड कर्झनबद्दल समाजात असंतोष पसरू लागला. निवेदिताही संतापून म्हणाल्या, 'सरकारच्या या शिक्षण समितीने सर्व शिक्षणावर, विशेषत: शास्त्र शाखांमधील शिक्षणावर बोळा फिरवलेला आहे. येथील नागरिकाला भारतीय राहण्याचे अधिकार नाही, स्वत:चे भवितव्य ठरवायचा अधिकार नाही. ज्ञान मिळवण्याचा, पोट भरण्याचा, न्याय मागण्याचा अधिकार नाही. याची मला चीड येते.' निवेदिता स्वत: शिक्षणतज्ज्ञ असल्यानं शिक्षणविषयक बाबींमध्ये व ज्ञानाच्या बाबतीत निष्क्रिय प्रवृत्तीवरही तिखट शब्दांत त्या टीका करत. त्यामुळे 'बिहार हेराल्ड' या वृत्तपत्रानेही म्हटले की, 'आमचे कान उपटणाऱ्या भगिनी निवेदितांसारख्या आणखी अनेक व्यक्तींची आज आम्हाला आवश्यकता आहे. हे कार्य केल्याबद्दल त्यांचे आम्ही नेहमी कृतज्ञच राहू.'

कॉंग्रेसच्या नेते मंडळींशी निवेदितांचा संपर्क दृढ होत चालला होताच. त्याचवेळी कोलकत्यातील तरुण लोकांशी, त्यांच्या उत्साही संघटनांशी निवेदितांचा संबंध कसा होता; जहाल आणि मवाळ कार्यकर्त्यांना त्या कशा सांभाळून घेत; त्याबद्दल आपण पुढील लेखात जाणून घेऊया.

***

(क्रमश:)

**डॉ. सुरुचि पांडे**
सी/९, भोसले पार्क, सहकारनगर क्र. २, पुणे 411009
suruchipande@gmail.com



**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

# सदाशिवाचे अग्निकांड

**स्वैर अनुवाद - वसुधा पंडित**



**छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेळची ही गोष्ट आहे. सदाशिव नावाचा एक खेड्यात राहाणारा मुलगा मामा-मामीच्या जाचाला कंटाळून घर सोडून निघाला. त्यानं शिवाजीच्या सैन्यात दाखल व्हायचं मनोमन ठरवलं.**

**सदाशिवाचं वय होतं जेमतेम सोळा; पण मनाची जिद्द आणि शिवाजी राजांवर असलेली अपार श्रद्धा, या दोनच जिनसा पोतडीत घालून निघाला बेटा ! आपल्या चतुराईने वाटेतील अडचणींवर मात करत-करत थडकला थेट शिवाजी महाराजांच्या दरबारात! थोड्याच दिवसांत कष्ट, चिकाटी आणि चतुराईच्या जोरावर शिवबा आणि जिजाबाईंच्या गळ्यातला सदाशिव जणू ताईतच बनला. वाचूया सदाशिवाच्या शौर्याची ही कहाणी...**

पावसाळ्याचे दिवस तोरणागडावर सदाशिव मजेत काढत होता. तो गडावर पडेल ते काम करायचा. गडावर जिऊ महाला त्याला तलवार चालवायला शिकवायचा. त्याच्या कामसू व विनम्र स्वभावामुळे जिजाबाई त्याच्यावर खूप प्रेम करायच्या. गडावरील बरोबरीच्या मुलांशीही त्याची ओळख झाली होती. सगळा एक परिवारच होता जणू !

सह्याद्रीच्या पायथ्याशी पाऊस भरपूर असायचा. नद्या-नाले ओसंडून वाहायचे. त्यामुळे पावसाळ्यात सैन्य, दारुगोळा घेऊन मोहिमेवर बाहेर पडणं मुश्किल होत असे. 'आता दसऱ्याच्या दिवशी सोनं लुटून तलवारीची पूजा करायची आणि मगच मोहिमा काढायच्या,' अशी शिवबाची योजना होती.

असेच एकदा जिजाबाई आणि शिवबा पट खेळत होते. तानाजी, येसाजी जवळच बसले होते. सदाशिव आपल्या जीव की प्राण असलेल्या तलवारीला चाचपत इकडे तिकडे हिंडत होता. एवढ्यात त्याचं लक्ष दुरून येणाऱ्या घोड्याच्या टापांच्या आवाजाकडे गेलं आणि नीट निरखून पाहाताच त्याला एक स्वार चिलखत घालून वेगाने गडाकडे येताना दिसला. पट खेळत असलेल्या शिवबाला हाका मारून त्याने तटाजवळ यायला सांगितलं. नीट न्याहाळल्यावर तो रत्नाजी असावा असं शिवबाला वाटलं. आणि खात्री पटताच शिवबाने हात हलवला. रत्नाजीजवळ सुंदर घोडा पाहून सगळ्यांना आश्चर्य वाटलं. ''हा रत्नाजी कोण?'' सदाशिवाचं कुतूहल वाढत होतं. तेव्हा शिवबानं सांगितलं, ''आपला 'हेर' म्हणून रत्नाजी विजापूरला सैनिकाचे काम करतो.''

'हं... म्हणजे फक्त तलवार चालवूनच पराक्रम करता येतो असं नाही; तर अनेक निरनिराळ्या कामांतूनसुद्धा 'स्वदेशभक्ती' करता येते', सदाशिवाला हळूहळू एकेक गोष्ट कळत होती.

थोड्याच वेळात तानाजी रत्नाजीला घेऊन आला. रत्नाजीला शिवबानं मिठी मारली. येसाजीनंही त्याला मिठीत घेऊन हळूच विचारलं, ''एवढा छान घोडा कुठून मिळवलास?''

हसत रत्नाजी म्हणाला, ''हा घोडा सेनापती लियाकतखानचा ! त्याच्याजवळ अनेक चांगले घोडे आहेत. मला हुकूम होता, सगळ्या


शोधा... http://teenink.com

घोड्यांना सकाळ-संध्याकाळ फिरवून आणण्याचा; तेव्हा आज सकाळच्या वेळी सर्वात चांगला घोडा निवडून मी इकडे आलो.''

लगेच शिवबाने म्हटलं, ''बरं, आता बातमी काय आणलीयस ती सांग.''

''बातमी चांगली नाहीये राजा. तू पावसाळाभर तोरणागड सोडत नाहीस, हे लक्षात घेऊन पाऊस संपायच्या आधीच विजापूरकरांची सात हजार फौज गडावर चालून येतेय. गडाला गराडा घालून जवळच्या तोफा डागून गडाची नासधूस करून टाकायचा त्याचा मनसुबा आहे. त्यांच्या सोबत वीस तोफा आणि शंभर पिंपं दारूगोळा आहे.''

ऐकून तिघेही विचारात पडले. ''किती दूर असतील फौजा?'' शिवबानं विचारलं.

''सकाळपर्यंत पंधरा कोसांवर होत्या. बरोबर तोफा असल्याने सावकाश येतायत. पंधरा दिवसांपूर्वी आम्ही बाहेर पडलो; पण फौज नक्की कुठे जातेय ते माहीत नव्हतं. फक्त लियाकतखान आणि त्याचे ३/४ सरदार यांनाच ते ठाऊक होतं. काल रात्री तंबूत बैठक भरली होती तेव्हा या बातमीचा सुगावा लागला. सकाळी कुणी उठायच्या आतच मी तिथनं निसटलो.''

सदाशिवाच्या मनात येऊ लागलं, 'सात हजार शत्रूची फौज? शिवाय तोफा? शिवबा कसे वाचतील यांतून? गड कसा वाचवणार? भवानीमाते, महाराजांना वाचवायची, त्यांना मदत करायची मला संधी दे.'

बऱ्याच वेळाने शिवबानं विचारलं, ''मग काय शोधताय उपाय?''

ताबडतोब तानाजीनं उत्तर दिलं, ''शिवबा, तू सांगशील ते आम्ही करू''

''गडावर आत्ता अडीचशे शिपाई आहेत. सात हजार फौजेशी आपण लढणं अशक्य.. शिवाय त्यांच्याजवळ तोफा आहेत तर आपल्याजवळ साधी बंदूकसुद्धा नाही. तेव्हा मला दोन मार्ग दिसतायत. एक, गड सोडून पळून जायचं. त्यामुळे जीव वाचला तरी गड त्यांच्या ताब्यात जाईल. आणि दोन, गडाचे दरवाजे बंद करून बसणे; पण त्यांच्याजवळ तोफा आहेत. शिवाय गडही छोटा आहे. तोफा डागून त्याची धूळधाण ते क्षणात करू शकतील.'' सगळेजणं शिवाजीच्या तोंडाकडे बघत राहचले. शेवटी येसाजीनं विचारलं,

''या दोन्हीपेक्षा तिसरा काही उपाय नाही का?''

''म्हणजे, हे दोन्ही पर्याय तुम्हाला पसंत नाहीत?''

सर्वांनी एकमुखानं सांगितलं, ''नाही.''

''मला एक युक्ती सुचलीय. आता आपला भरवसा फक्त दारुगोळ्याच्या पिंपांवर,'' शिवबा म्हणाला.

सर्वांनी विचारलं, ''दारूची पिंपं?''

हलक्या आवाजात शिवबाने आपली कल्पना मांडली. ऐकून सर्वजण उत्साहाने भारून गेले. 'मीच जाणार' म्हणून प्रत्येकजण नाचायला लागला.

रत्नाजी म्हणाला, ''मला पाहताच ते मला ओळखतील, नाही तर मीच गेलो असतो.''

''तुम्हाला कुणालाही जायची गरज नाही.''

''म्हणजे शिवबा, तू स्वत: जाणार?'' सर्वांनी एकदम विचारलं.

''छे, छे, मी नाही जाणार. हा छोटा, नव्या चेहेऱ्याचा सदाशिवच जाईल. हा दिसतो छोटा, मिसरूडसुद्धा फुटलेली नाही; पण डोकं चांगलं चालतं याचं,'' सदाशिवाच्या पाठीवर थोपटत शिवबा म्हणाला. सदाशिव स्वत:ला धन्य धन्य समजू लागला. शिवबाने सर्व गोष्टी त्याला समजावून सांगितल्या.

दुसऱ्या दिवशी सूर्य उगवण्याआधीच गडाचा दरवाजा उघडला गेला आणि शेळ्यांचा कळप घेऊन सदाशिव बाहेर पडला. अंगावर होता फक्त मळका सदरा अन् चड्डी. उजव्या हातात गुरांना हाकण्यासाठी काठी; त्या काठीची मूठ होती लोखंडी. दुसऱ्या हातात होती सुंभाची खंडाळी.

१५/२० शेळ्या हाकत सदाशिव बाहेर पडला. रोजच्या गुराख्याऐवजी आज सदाशिव गुराखी झाला होता.

सदाशिव गावातच वाढल्याने शेळ्या गुरं चरणीला नेणं त्याला नवीन नव्हतं. वाटेत गारगोटीचा दगड त्याने शोधून काढला व जपून ठेवला. हळूहळू कानोसा घेत घेत तो पुढे पुढे जात होता.


प्रायोजक - श्री. विद्याधर सहसबुद्धे, अंधेरी

थोड्याच वेळात घोड्यांच्या टापांचे आवाज जवळ येऊ लागले. म्हणजे घोडदळ पुढे आणि नंतर पायदळ येत असावे. सदाशिव अंदाज घेत झाडापाशी थांबला. हळूहळू सैन्य दृष्टिपथात आले. घोडदळ, पायदळ त्यानंतर येणाऱ्या बैलगाड्यातनं वीस तोफा येत होत्या. एकेका गाडीला ८-८ बैल! एवढी माणसं, घोडी, बैलगाड्या सदाशिवानं आजवर पाहिल्या नव्हत्या.

दुपारनंतर विजापुरी फौजा गडाच्या पायथ्याशी ऐसपैस पसरल्या. गडाच्या दारापासून जवळजवळ तीनेकशे गज अंतरावर त्या विखुरल्या होत्या. तंबू ठोकले गेले. मधोमध होता सेनापतीचा डेरा. सेनापतीच्या तंबूसमोर गालिचा, दिवाण, तक्के पसरले गेले. लियाकतखान लोडाला टेकून बसला. त्याची दृष्टी लागली होती गडाकडे.

''काय? पकडलं की नाही डोंगराच्या चूहयाला? नाही ना जमलं पळ काढायला त्याला.''

लगेच इमानी सेवक बडबडला, ''हुजूर, त्याला वेळच कुठे मिळाला पळायला? गडाचे दरवाजे उघडे थोडेच आहेत !''

''शिवाजीचं मला काही सांगू नकोस, महाधूर्त आहे तो ! एक दोघांना कुणाला तरी ठेवून बाकीच्यांसकट पळूनही जायचा; पण यावेळी मात्र नक्की पळाला नाही, तशी बातमीच दिलीय हेरानं !''

''आणि तो हरामखोर घोडेचोर?''

''तो नक्कीच शिवाजीचा माणूस असेल. काल दुपारी आला असणार गडावर म्हणूनच शिवाजीला पळता आलं नसणार.''



तेवढ्यात एक फौजदार सलाम ठोकत सांगू लागला, ''हुजूर दारुगोळ्याची पिंपं छावणीच्या मागे ताडपत्र्यांखाली झाकून ठेवलीयत. तोफा मात्र बैलगाड्यांतून उतरवल्या नाहीत. आता काय आज्ञा आहे?''

''संध्याकाळ उलटून गेलीय. तोफा राहू द्या तशाच. नाहीतरी त्या गडासमोरच न्यायच्या आहेत. बाकी आत्ता विशेष काही नाही. पहारा मात्र जोरात असू द्या.''

सेनापतींचा हुक्का चालू होता. एवढ्यात - 'ब्यँ- ब्यँ' असा शेळ्यांचा आवाज ऐकून सेनापती दचकले. एक पोरगेलासा तरुण त्या शेळ्यांना हाकत येत होता. त्याच्या कमरेला होती काथ्याची दोरी. त्याला ढकलत खिदळत शिपाई येत होते. ही शेळ्यांची वरात बघायला गर्दी होत होती. कमरेची दोरी खेचत शिपाई सेनापतीसमोर आला,

''हुजूर, हा छोकरा शेळ्यांसकट छावणीच्या मागच्या जंगलात लपलेला सापडला. याचं काय करायचं?''

''कोण रे तू?''

सदाशिवाने भोकाड पसरलं.

''घाबरू नकोस. या शेळ्या कुठे मिळाल्या तुला?'' आपलं रडं आवरत



हुकूम आहे.''

''कोण रे हा?''

''तुला नसत्या चौकश्या कशाला हव्यात? सांगितलंय तेवढं कर.''

शिपाई गेला निघून आणि सदाशिव एकटा पडला. त्याच्या शेळ्यांना भटारखान्यात भरती केल्यामुळे त्याला वाईट वाटलं. कंबरेची दोरी आणि हातातली काठी सांभाळत इकडे तिकडे नीट निरखत सदाशिव फिरत होता.

सदाशिवाने म्हटलं,

''शेळ्या आहेत गडावरल्या. मी त्या चरायला नेतो.''

''तू गडावर रहातोस?''

''हो.''

''का रे, तुमचा शिवाजी आहे का गडावर?''

''हो, तर, महाराज आहेत की.''

''आणखी कितीजण आहेत गडावर?''

''असतील दोन-तीनशे.''

''का रे, काल बाहेरून कुणी आलं होतं का गडावर?''

''मला कसं कळणार? मी तर शेळ्या घेऊन सकाळीच निघतो तो एकदम संध्याकाळीच जातो परत.''

''मग आज का नाही गेलास?''

''निघालोच होतो; पण तेवढ्यात तुमची ही एवढी माणसं, बैलगाड्या, घोडे दिसले आणि मी घाबरून तिथे लपलो.''

सदाशिवाचा गबाळा अवतार पाहून त्याच्या खरं बोलण्याची लियाकतखानाची खात्रीच पटली.

''टाका रे ती दोरी सोडून.'' शिपायानं दोरी सोडली. आता सदाशिव जमिनीवर फतकल मारून बसला आणि जोरात रडायला लागला.

''काय झाले बाबा तुला आता?''

''मला भूक लागलीय ना,'' सदाशिव रडत म्हणाला.

''जा रे त्याला घेऊन, पोटभर खायला द्या आणि त्याच्या शेळ्या द्या पाठवून भटारखान्याकडे.'' सेनापतींनी हुकूम दिला.

ज्या शिपायानं सदाशिवाला धरून आणलं होतं तोच शिपाई त्याला भटारखान्याकडे घेऊन निघाला.

विजापुरी फौजेत काही हिंदू सैन्य होतं. त्यांच्यासाठी वेगळं जेवण बनवलं जायचं. शिपाई सदाशिवाला घेऊन त्या भागात गेला आणि एका आचाऱ्याजवळ जाऊन त्याने सांगितलं, ''याला खायला द्या.

'हं, ही बहुतेक छावणीची मागची बाजू असावी. थोड्या अंतरावर बैलगाड्यांच्या रांगा दिसतायत. आणि तोफा दिसतायत ठेवलेल्या त्यांच्यावर ! दोन्ही बाजूंच्या गाड्यांवर ताडपत्री घातलेली दिसतेय. हे दोन दाढीधारी पहारेकरी गस्त घालत असावेत. हा झाकून ठेवलेला ढीग म्हणजे दारूगोळा असावा, पावसानं भिजू नये म्हणून झाकून ठेवलाय वाटतं' तो विचारात पडला.

थोड्या वेळाने एका आचाऱ्याने त्याला भाकरी-भाजीचं जेवण आणून दिलं. सदाशिव पोटभर जेवला. अजूनही थोडाफार उजेड होता; त्यामुळे त्याने टेहेळणीला सुरुवात केली. प्रत्येकजण आपापल्या कामात गर्क असल्याने सदाशिवाकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. काळोख पडल्यावर, रात्री पथारी टाकण्यासाठी जागा शोधत शोधत तो बैलगाड्यांच्या बाजूला गेला. एका


प्रा.- श्री. सागर सुभाष सुराणा, चिंचवड, पुणे

आडोशाला बैलगाडीपाशी तो आडवा झाला आणि क्षणात घोरायला लागला.

मध्यरात्रीनंतर केव्हातरी सदाशिवाला जाग आली. त्या ताडपत्रीखालून बाहेर डोकावत तो बेत ठरवू लागला. कमरेची दोरी आणि चकमकीचा दगड त्याने चाचपले. तो पहारेकऱ्यांच्या हालचाली न्याहाळू लागला. दारूगोळ्यावर पहाऱ्याला दोन पहारेकरी होते. मशालींच्या उजेडात काळोख्या रात्री थोडंसं बिचकतच सदाशिव आपल्या जागेवरून रांगतरांगत दारूगोळ्यांच्या पिंपांजवळ गेला. पिंपावरची ताडपत्री थोडी वर करून ताडपत्रीखाली लपला. तेवढ्यात दोघे पहारेकरी तिथे आले अन् हलक्या सुरात बोलू लागले,

''काय मियाँ? गारठलात काय?''

''होय रे बाबा, डोंगरातला गारठा जरा जास्तच वाटतो. छानपैकी शेकोटी पेटवूया का? थोडी तरी ऊब मिळेल.''

''छे ऽ ऽ, भलतंच काय? एवढा दारूगोळा असताना शेकोटीचं नावसुद्धा काढू नकोस, जिवंत राहायचंय ना?''

त्यांच्या पायांचे आवाज दूर जाताना ऐकू आले तेव्हा सदाशिव हळूहळू बैलगाड्यांच्या रांगांत फिरू लागला. पहारेकऱ्यांच्या चाहुलीने सावध होत होता. पिंपावरची ताडपत्री थोडीशी वर करून तो आत डोकावू लागला. सदाशिवाने खात्री करून घेतली तो नक्की दारूगोळ्यांच्या साठ्याजवळ होता.

एवढ्यात ठण्, ठण्, ठण् अशा जोरदार आवाजाने तो दचकला. भयाण रात्री शत्रूच्या छावणीत तो होता आणि छावणीतले तासाचे टोल वाजले होते.

छातीत धड् धड् व्हायला लागलं होतं. सदाशिवाच्या हातात काथ्याच्या दोरीचं एक टोक होतं आणि दुसऱ्या हातात गारगोटी होती. काठीची मूठ होती लोखंडी. त्यावर तो हळूहळू गोरगोटी घासायला लागला. आवाज होऊ न देता घासायचा तो प्रयत्न करत होता. घासत असता ठिणग्या उडायला लागल्या. लगेच काथ्याच्या दोरीचं टोक त्याने त्या ठिणगीजवळ ठेवलं. ठिणगी त्यावर पडू लागताच दोरीवर जाळ धरू लागला. हळूहळू दोरीच्या टोकावर चांगला जाळ दिसताच सदाशिवाने पेटत्या दोरीचं टोक दारूच्या एका पिंपावर ठेवलं. 'दोरी जळत जाऊन दारूगोळ्याच्या पिंपात जाळ होऊन सगळंच पेटून उठेल. एवढा भला थोरला दारूगोळा एकदा का पेटला की झालं ! सगळी फौज त्यांच्या सामानासकट जिवानिशी जळून जाईल, हे नक्की !'

सदाशिवाने त्यांच्यावर सोपवलेली कामगिरी उत्तम पार पाडली होती. दोरी जळत असल्याची खात्री करून तो जे धूम पळत सुटला ते थेट गडाच्या दिशेने...

हळूहळू सगळेजण गडाच्या भिंतीजवळ जमा झाले. प्रत्येकाच्या मनात शंका होती की, सदाशिव काम फत्ते करेल का? काथ्याच्या दोरीच्या आधाराने दारूगोळा पेटेल का? शत्रू नामशेष होईल का? कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. अधीरपणे जो तो टक लावून बघत होता. वातावरण तणावपूर्ण झालं होतं.

ठोऽ ठोऽ जोरदार आवाज झाले. समोर आगडोंब उसळला. माणसं पळताहेत; पण आग याहून वेगाने पसरत जातेय. हे पाहून 'जय भवानी,' 'हरहर महादेव' म्हणत गडावर सगळे नाचायला लागले. पहाटे उजाडायच्या आत शिवबा आपल्या मावळ्यांसकट गडाखाली उतरला.

ठिकठिकाणी प्रेतांचा खच पडला होता. जागोजागी विध्वंसाच्या खुणा असल्या तरी सोनं, नाणं, रोकड, तलवारी ज्याला जे मिळेल ते त्यानं उचललं. तोफा उचलून गडावर आणण्यात आल्या.

शिवबाने सांगितलं, ''गडाचं रक्षण करायला तोफा तर मिळाल्या, दारूगोळा बनवणं अवघड काम नाही.''

सगळीकडे आनंदी आनंद झाला. सदाशिवाच्या नावाचा जयघोष सुरू होता. एवढ्यात धापा टाकत सदाशिव तेथे पोहोचला. शिवबाने त्याची पाठ थोपटत त्याला घट्ट मिठीत घेतलं. आणि जिजाबाईंच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले.

***

मूळ बंगाली लेखक -
शरदेंदु बंदोपाध्याय
**अनुवाद - वसुधा पंडित**
२०२, किस्मत रेसिडेन्सी,
५२६, १२ वा रस्ता, डायमंड गार्डन,
चेंबूर, मुंबई 400071

ललित



# पाऊस माझ्या घनातला...

दत्ता हलसगीकर

**पाऊस! कधी रिमझिमता, कधी धुवाधार तर कधी बंडखोर! अशी पावसाची अनेक रूपे... कधी वाट पाहायला लावून डोळ्यांत पाणी आणणारा हा पाऊस, तर कधी दु:खहर्ता होऊन मनाला पल्लवित करणारा... असा हा विविधरूपी पाऊस थेंबाथेंबांनी लेखकाच्या शब्दांत, कवितेत, मनात उतरला...**

ऋतुचक्र ही निसर्गानं घडवलेली अद्‌भुतरम्य किमया आहे. सहाही ऋतू एकमेकांच्या हातात हात घालून चक्राकार फेर धरतात. या विश्वाचं भरणपोषण करून उत्पत्ती, स्थिती आणि लय ही प्रकृती जपतात. प्रत्येक ऋतूचा स्वत:चा एक स्वभावविशेष आहे, एक नियमितपणा आहे, एक लय आहे. ही लय चुकली की, विपरित घडतं आणि मानवी जीवनाची शोकांतिका होते. लय नीट साधली तर 'सर्वेऽपि सुखिन: सन्तु' असं शुभंकर घडतं.

तसे सगळेच ऋतू मला प्रिय आहेत; पण मला सर्वाधिक आवडतो तो वर्षाऋतू. सहस्रधारांनी भूमीला न्हाऊ घालणारा, नद्या-नाले, जलाशय सुजलाम् करणारा, भूमीवर 'हिरवे हिरवे गार गालिचे, हरिततृणांच्या मखमालीचे' पसरवणारा, काळ्या मातीला सृजनाचे डोहाळे पुरवणारा आणि डोलणाऱ्या टपोर कणसांमधून टपोर मोती मिळवणारा!

वर्षाऋतूतील पावसाची विविध रूपे मी आजवर पाहिली आहेत. कधी पावसाचं रिमझिमणं तर कधी त्याचं रौद्ररूप. मी गावात राहात होतो तेव्हा पत्र्याचं छत असलेल्या खोलीवर ताशे वाजवून तडतडणारा, छताच्या छिद्रातून घरभर झालेला पाऊस मी अनुभवलेला आहे. आता माझ्या गावाबाहेरच्या घरासमोरच्या विस्तीर्ण मैदानात मोकळ्या अंगानं कोसळणारा धुवाधार पाऊसही मी पाहतो आहे. ...कधी वर्ष वर्ष हुलकावणी देऊन बेपत्ता झालेला पाऊस ! तृषार्त भूमीला भेगा पाडणारा परागंदा पाऊस! आकाशाकडे डोळे लावून व्याकूळ झालेल्या शेतकऱ्यांच्या पापण्यात गोठलेला पाऊस! तर कधी ओल्या दुष्काळानं जगण्याची वाताहत करणारा सैरभैर पाऊस !

हा वर्षाकाळ आणि पाऊस मी वेळोवेळी अनुभवला. त्याचं सुखकर-सुंदर, रौद्रभीषण रूप मी पाहात गेलो तसं तसं ते शब्दकार होत गेलं. माझ्या 'शब्दघना'तला हा विविधरूपी पाऊस थेंबाथेंबांनी कवितेत उतरला. त्याचीच काही रूपं म्हणजे माझ्या काही कविता.

मध्यंतरी दोन-तीन वर्ष पाऊस म्हणून झाला नाही. आकाशात नुसते पांढऱ्या ढगांचे पुंजके ! प्यायला पाणी नाही, पीक नाही, जनावरांना चारा नाही. शेतात नुसती भेगाळणारी ढेकळं. गरीब शेतकरी मात्र हवालदिल. काही जनावरं छावणीत आणून सोडलेली तर बरीचशी खाटिकखान्याच्या दिशेनं दोर ओढीत चाललेली. हे करुण दृश्य वरुणाच्या अवकृपेनंच पाहावं लागत होतं. दयाघन


प्रायोजक - स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे


असणारा पाऊस कठोर झाला होता. मी पावसाची मनोमन प्रार्थना केली -

**जसा मी मनातून येतो भरोनी**
**तसा तू घनातून ये पावसा,**
**अश्रूतुनी अर्थ भासत यावा**
**तसा थेंबाथेंबात ये पावसा!**
**धरेचे अरे ओठ वाळून गेले**
**तुझी पाहता वाट मातीतूनी,**
**जसा सावळा श्याम गोपीस भेटे**
**तसा आर्त होऊन ये पावसा!**
**सभोती पाहा रूक्ष ओसाड ऊन**
**नदीपात्र झाले रिते कोरडे,**
**निळा मोर घेई पिसारा मिटोनी**
**दयावंत होऊन ये पावसा!**
**दिशा हंबराव्या तशी हंबरोनी**
**व्याकूळ झाली गुरेवासरे,**
**त्या दीन गावामुखी घास द्याया**
**पान्ह्यापरी दाट ये पावसा!**
**अता सोसवेना उन्हाळा**
**किती रम्य संसार झाले मुके,**
**घरा अंगणा जीवना शांतवाया**
**तू देवतारूप ये पावसा!**
**तुला आण आहे तृणांची-फुलांची**
**सुन्या झोपडीच्या रित्या वाडग्यांची,**
**कवितेतुनी माझिया शब्द येती**
**तसा प्राण होऊन ये पावसा!**

प्रार्थना मनाच्या तळातून असली आणि आपला टाहो खरा असला की, 'कठोरपण' द्रवतं आणि पाझरतं. अनेक हताश जीवांप्रमाणे माझीही प्रार्थना पावसानं ऐकली असावी. आकांताचं दर्शन त्याला घडलं असावं. त्याचं मन करुणेनं तुडुंब भरलेलं असावं. म्हणूनच तो पाऊस विलोभनीय आणि आईच्या मायेचा होता.

मला दिसलेला पाऊस विविध रूपातला आहे. तो माझ्या शब्दांतून अवतरला आहे -

**पाऊस आला लयीत सुंदर, आल्या सरीवर सरी**
**पाऊस आला गर्जत वाजत, धरणी माळावरी**
**पाऊस आला सैरावैरा, प्रमत्त योद्ध्यापरी**



**पाऊस आला संथ धार, वाही शिवपिंडाचेवरी**
**वरुणाची जळपुष्पे झरती, आमच्या माथ्यावरी**
**पाऊस आला या शब्दांनी, हिरवळ दाटे उरी**

पाऊस बरसला हा आनंद तर मनात होताच. मग पावसाची सुखमय रूपे मला दिसू लागली. पाऊस हे सुष्टीला आणि प्राणिमात्रांना मिळालेलं वरदान आहे, असं वाटू लागलं. पावसाच्या स्पर्शानं केवढं विश्व उमलतं हे मला कळून चुकले-

**पाऊस धारांचा धारांचा, नाचणाऱ्या मोराचा**
**पाऊस सरींचा सरींचा, निळ्यासावळ्या हरीचा**
**पाऊस स्वातीचा स्वातीचा, आतुर काळ्या मातीचा**
**पाऊस नादाचा नादाचा, लेकुरवाळ्या छंदाचा**
**पाऊस आईचा आईचा, चाऱ्यासाठी गाईचा**
**पाऊस देवाचा देवाचा, भोळ्या भक्तिभावाचा**

हा करुणाघन पाऊस कधी कधी वेडापिसा होऊन येतो. त्याचं सर्वसंहारक रौद्ररूप असतं. नद्यांना महापूर येतात, गावं जलमय होतात. 'नको हा पाऊस' अशी अवस्था होऊन जाते. असा पाऊस मी पाहिला तेव्हा मनातून थरारलो -

**आला पाऊस रणाणा, झोपडीचा चोळामोळा**
**कसा आवरू मांडिला, माझा संसार सगळा**
**पीठमाती एक झाली... चूल गेली ग फुटून**
**झाला विस्कोट जन्माचा, आला पाऊस कुटून?**
**शेतातून पाणी पाणी, उरी काहूर मांडतो**
**आज कसा हा पाऊस, हत्तीसोंडेने सांडतो**
**कधी करावी पेरणी, रानभर उंच तण**
**दैव तरी असं कसं?, उभं शेतात मरण**
**सैरावैरा हा पाऊस, जसा नाचतो वेताळ**
**कसा कोसळे गर्जून, बेमुर्वत नि बेताल**
**सारा हाहाकार इथे, दिशा दिशा झाल्या सुन्न**
**असा आकांत भोवती डोळे वाहती भरून.**

पावसाचं असं आक्रस्ताळी रूप नेहमीच असत नाही. पण कधीतरी जेव्हा ते असतं, तेव्हा पाऊस वरदानापेक्षा शाप वाटावा, असा असतो. पाऊस हा सृजनाची प्राणशक्ती आहे. आधी तो पोटाची भूक शांत करतो. ही पोटं भरली म्हणजे माणसाला गाणं सुचायला लागतं. मग साहित्य-संगीत-कलांचा सुरम्य मोरपिसारा उलगडतो. माणसं एकमेकांना उराउरी भेटतात, एकमेकांचं क्षेमकुशल पुसतात, आधार होतात, जीवन फुलवतात. प्रत्येकजण एकमेकाला पूरक असला तरी पाऊस हा सर्वांचा सुखकर्ता आणि दु:खहर्ता आहे.

हा पाऊस मला 'अंगे भिजली जलधारांनी' या वसंतसेना आणि चारुदत्ताच्या भेटीत दिसतो. तानसेनानं आळवलेल्या मल्हार रागानं वेढतो. हा पाऊस 'श्रावणात घन नीळा बरसला' या निसर्ग ओळीतून बिलगतो. कधी 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात' या बालगीतातून रिमझिमतो. या पावसात मी अनेक वेळा भिजलो आहे. अजूनही भिजतो; पण पाऊस मला कधीही बाधला नाही. त्याचं माझं ओंजळ नातं त्याला माहिती असावं, आषाढात 'गडद निळे गडद निळे घन भरून आले' की बोरकर आठवतात.

असा हा पाऊस माझा, तुमचा, सर्वांचा आणि सर्वांसाठी कल्याणकारी; तरी पण तो सर्वाधिक जवळच्या नात्याचा आहे तो शेतकऱ्यांच्या! असाच उशिरा आलेला पाऊस जेव्हा शेतात बरसतो तेव्हा शेतकऱ्याच्या कुटुंबाला झालेला आनंद मी कवितेतून प्रकट केला आहे -

**किती दिवसांनी आला आज पाऊस दारात**
**मेघ:श्याम बरसला माझ्या उजाड रानात**
**आई म्हणाली,''विठ्ठला, तूच आलास धावत**
**अरे, पीकपाणी सारे काही लपले मातीत''**
**आणि वडील म्हणाले,' ''नांगरून झाले,**
**तुझ्यासाठी आकाशात रोज डोळे लागलेले''**
**किती आनंदी बायको, नेत्री पाऊस पाऊस**
**म्हणे, तुझ्या हातांनी रे मिळे साऱ्या घरा घास**
**भूमी तापलीतापली तिने करुणा भाकली**
**ओल्या ढगाची पखाल भूमीपावेतो वाकली**
**असा पाऊस देवाचा कृपा होऊन सांडला**
**आणि मोडलेला डाव थेंबाथेंबांनी मांडला**

असा हा पाऊस लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना हवाहवासा. माती बरोबरच आपल्या मनातील बीजांना अंकुरित करणारा, पल्लवित करणारा, सुफलाम् करणारा आणि मनाला दयाघनाचं वरदान देणारा !

***

**- दत्ता हलसगीकर**
२० अ, जवाननगर विजापूर रस्ता,
सोलापूर 413004


**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

# याला 'जेवण' ऐसे नाव !

– डॉ. संगीता बर्वे



**माणसाला जिंकण्याचा मार्ग त्याच्या पोटातून जातो; पण या पोटाकडेच आपण सर्वात जास्त दुर्लक्ष करतो. खरंतर 'पेट सलामत तो काम पचास' असंच म्हटलं पाहिजे. नुसतंच 'उदरभरण' न करता जाणीवपूर्वक सकस आहाराबरोबर जेवणाची योग्य पद्धत अमलात आणायला हवी. तरच पोटाबरोबर आपले मनही प्रसन्न राहून आपली कार्यक्षमता वाढायला मदत होईल.**

मी आहारतज्ज्ञ म्हणून पदवी घेतली तरी माझं डोकं आणि मन खरंतर कवितेत रमतं; पण आहाराविषयी अभ्यास केला आहे आणि त्याबद्दल दोन चांगल्या गोष्टी सांगता आल्या आणि तुम्हाला त्या पटल्या तर चांगली निष्पत्ती होऊ शकते, या विचाराने लिहायला बसले.

'काही माणसं खाण्यासाठी जगतात तर काही माणसं जगण्यासाठी खातात', हा प्रसिद्ध विचार तुम्ही ऐकला/वाचला असेल. आपण यापैकी कोणत्या गटात जायचं, असा एक विचार करून पाहावा; पण उदात्त विचार, आणि कृतींचे आचरण करताना पोटाचे हाल केले तर तितक्या सक्षमतेने कामही होणार नाही. हो नं ! जेवणामुळेच तर जीवन जगता येते. आणि समृद्ध जीवन जगण्यासाठी 'चांगला' आहार आवश्यक असतोच.

मग माझ्या डोळ्यांसमोर सातवी ते दहावी या वयोगटातली माझी सर्व दोस्तमंडळी आली. त्यांच्या जेवणाचं चित्र मला स्पष्टपणे दिसू लागलं. शाळेच्या वेळात ठरलेल्या सुट्टीत जेवण होते; पण सुट्टीच्या दिवसांत काय? आपली रोजची जेवणाची वेळ, पद्धत डोळ्यांसमोर आणून बघावी. आपण स्वत: दूर उभं राहून आपल्यालाच जेवताना बघतोय अशी कल्पना तर करा! आपण आपलेच नीट सूक्ष्मतेने निरीक्षण करून तर पाहा...

काय दिसले?

**दृश्य १**

*मे महिन्याची सुट्टी.*
*आई-बाबांना सुट्टी नाही. ते कामावर गेले आहेत.*
*दुपारचे दोन-अडीच. इंटरनेट सुरू.*
*अचानक भूक लागल्याचं लक्षात येतं.*
*टेबलावर काय काय आहे?*
*पोळी, भेंडीची भाजी (शी !) भात, आमटी,*
*जाऊ दे, भात आमटीच खावी. सोबत सॉस घेऊ.*
*खाता खाता चॅटिंग किंवा गेम्स.*
*नजर समोर संगणकाकडे. अधूनमधून*
*चमच्यानं एकेक घास तोंडात टाकायचा...*
*डिशमध्ये खरकटं तसंच... डिश तिथेच. तशीच !*
*हात धुऊन पुन्हा इंटरनेट.*
*तेवढ्यात काल आणलेल्या वेफर्सची आठवण येते.*
*एकेक वेफर्स तोंडात टाकता टाकता चॅटिंग सुरूच !*
*तोपर्यंत दुपारचे चार वाजलेले असतात.*
*बोअर होतंय. काय करावं कळत नाहीये.*
*मित्रमैत्रिणींना फोन होतात.*
*शी ! चिवडासुद्धा नाही घरात. बिस्किटं मात्र दिसतायत.*


जवाहर नेहरू पुरस्कार : अँजेला मर्केल

*एका डब्यात खजूर ! (हॅट ! खजूर काय खायचा?)*

*बिस्किटांचा डबा उघडून दोन चार बिस्किटं तोंडात.*

*पाच वाजले, आई घरी आली.*

*''आई, भूक लागलीये. कसल्या गं भाज्या करतेस रोज! काही तरी मस्त कर ना ! मॅगी करायचं का? की हक्का नूडल? मी आणून देते/देतो सगळं तुला.''*

*मग चापून मॅगी खाल्ली जाते.*

*रात्री जेवणाची वेळ.*

*''चल, जेवायला वाढलंय.'' इति आई,*

*''नको .मी नाही जेवणार. अगं खूप मॅगी खाल्लीये.''*

*''अरे/अगं झोपायच्या आधी ब्रश तरी कर.''*

*''अं ! झोपू दे गं. नंतर उठेन मी दात घासायला. आत्ता खूप झोप येतेय.''*

**दृश्य समाप्त.**

हे दृश्य माझ्या दोन छोट्या मैत्रिणींना वाचून दाखवलं. त्यातली एक म्हणाली, ''संगीतामावशी, असं मी किंवा दादाच नाही तर माझे बाबादेखील ऑफिसमधून घरी आले की टी.व्ही. सिरियल बघत बघत जेवतात.''

आता खालील दृश्य डोळ्यांसमोर आणून पाहा बरं...

**दृश्य २**

*जेवणाचं टेबल स्वच्छ पुसलेलं आहे. ताटं, वाट्या व्यवस्थित पुसून ठेवलेल्या. शेजारी पाण्याची भांडी.*

*आई-बाबा, ताई-दादा, आजी-आजोबा सर्वजण एकत्र (टेबल किंवा भारतीय बैठक) जेवायला बसले आहेत.*

*चटणी, कोशिंबीर, भात, भाजी, आमटी, पोळी या जेवणाच्या साध्याच पण सकस मेनूवर सर्व मंडळी यथेच्छ ताव मारतायत.*

*सोबत दिवसभरातल्या घडलेल्या घटना एकमेकांना सांगत हसत खेळत चवीनं जेवण चाललंय. मधूनच आईकडून छोट्याला, 'अरे ! भाजीची चव तर बघ, सगळं ताट स्वच्छ कर' म्हणून प्रेमळ दमही मिळतोय.*

*गप्पा मारत मारत जेवण आटोपलं की, प्रत्येकजण ताटं उचलायला, मागचं आवरायला मदत करतोय. मग आपापल्या उद्योगाला प्रत्येकजण मोकळा !*

**दृश्य समाप्त.**

आई, बाबा, आजी, आजोबा कुणी ना कुणी आपल्याला जेवणाबद्दल वेळोवेळी सांगत - शिकवत असतात.

सारखं सारखं 'तेच ते' सांगण्याची वेळ त्यांच्यावर का येऊ द्यायची?

डायनिंग टेबल/भारतीय बैठक वापरून अशाप्रकारे एकत्र जेवायला बसल्यानंतर जेवायला २० ते २५ मिनिटं पुरतात. गप्पा मारता मारता जेवलो तर अर्ध्या तासात व्यवस्थित जेवण होतं. त्यांतर आपल्याला जे काही करायचे आहे (जे बरेचदा आपण जेवता जेवताच करत असतो. उदा. दृश्य क्र. १) ती सर्व कामं आपल्याला निवांतपणे करता येतात.

आई-बाबा कुटुंबासाठी पैसे मिळवतात. त्यातील एक उद्देश सर्वांना 'चार घास' 'चांगले' खाता यावेत हा असतो. आपलं आरोग्य, शिक्षण... यासाठी ते जर इतके कष्ट घेत असतील तर 'पूर्णब्रह्म' मानून अन्न आवडीनं खाणं, ताटात, डब्यात 'न टाकणं' हे आपलं कर्तव्य, आपली जबाबदारी नाही का?

अन्नातून आपल्या शरीराला आवश्यक जीवनसत्वे, प्रथिने मिळत असतात. त्यावर आपले आरोग्य अवलंबून असते. कुठलंही काम करण्याची ऊर्जा, उत्साह आपल्याला फळे, भाजीपाला, दूध यांनी युक्त अशा आहारातूनच मिळत असतो. त्यामुळे ताटात वाढलेल्या कोणत्याही पदार्थाला नावं न ठेवता खावं. जेवताना भोवतालचं वातावरणही प्रसन्न हवं. आपल्याला अन्नाविषयी प्रेम वाटलं पाहिजे. जसं आपल्याला व्यक्तिमत्त्व असतं तसं फळांना, भाज्यांनाही आपापलं व्यक्तिमत्त्व असतं. मात्र त्यांचं व्यक्तिमत्त्व ते आपल्या पोटासाठी समर्पित करत असतात. त्यामुळे त्यांचाही मान ठेवायला आपण शिकलं पाहिजे.

समारोप करता करता एकच सांगते:

*कोणी-कोणी सतत, काही-काही शिकवणं*
*प्रत्येकवेळी आपल्याला, आवडतंच; असं नाही*
*प्रत्येकवेळी आपण ते ऐकेताच; असंही नाही*
*शेवटी आपलं आपल्याला 'स्वत:चं' म्हणून*
*काही 'कळतंच' ना !...*

***

**- डॉ. संगीता बर्वे**
स्नेहलबाग, सहकारनगर - २,
पुणे 411009

# माझा पहिला सायकल प्रवास...

**शिवराज पिंपुडे**

**सहल, भटकंती हे शब्द आपण नुसते उच्चारले तरी अंगात चैतन्य, उत्साह सळसळतो. हो नं...? मग आपल्या या सहलीला थोडीशी साहसाची जोड दिली तर? आपल्या क्षमता आजमावण्यासाठी अशी सहल ही एक उत्तम संधी आहे. आपल्या क्षमता जाणत-आजमावत केलेली अशी साहस सहल मग नक्कीच अर्थपूर्ण होईल. हा लेख वाचून तुम्हालाही अशीच अर्थपूर्ण सहल करण्याची प्रेरणा निश्चितच मिळेल...**




मी अकरावीत असतानाची गोष्ट. कॉलेजात पहिलंच वर्ष असल्यामुळे तासांना न बसण्याचा संस्कार अजून व्हायचा होता. त्यामुळे नियमित सर्व तासांना मी हजेरी लावायचो. मराठीच्या तासाचा मात्र जाम कंटाळा यायचा. संपता संपत नसे तो तास. त्यावर मी माझ्यापरीने एक उपाय शोधून काढला होता. अकरावीच्या आमच्या मराठीच्या पाठ्यपुस्तकात श्री. अविनाश धर्माधिकारी यांचा एक पाठ होता. त्यात त्यांच्या एका सायकल सहलीचं वर्णन होतं. खूपच मस्त होता तो पाठ. प्रत्येक मराठीच्या तासाला मी तो पाठ वाचून काढायला लागलो. या पारायणाचे २ परिणाम घडले. एक म्हणजे मराठीच्या तासाचा वेळ मजेत जाऊ लागला अन् दुसरी गोष्ट म्हणजे आपणही सुट्टीमध्ये सायकलवर भटकंती करावी, असं तीव्रतेने वाटू लागलं. लगेचच मनातला बेत मित्रांसमोर व्यक्त केला. त्यांनी ही कल्पना उचलूनच धरली अन् दिवाळीच्या सुट्टीत सायकल सहलीला जाण्याचं आमचं ४-५ जणांचं निश्चित झालं. ठिकाण ठरलं - साताऱ्याजवळचा सज्जनगड.

एकदाची परीक्षा संपली अन् सगळेजण सहलीच्या तयारीला लागलो. सायकल ठीक-ठाक करणे, सायकल दुरुस्तीचे प्राथमिक धडे गिरवणे, सहलीमधल्या मुक्कामांचे नियोजन करणे. इ. पण सहलीला जायचा दिवस जसजसा जवळ येऊ लागला तसतसा एकेक मित्र एकेक अडचण सांगू लागला. कोणाचे बाबा नको म्हणाले, कोणाच्या आजीने अबोला धरला, कोणाचं अचानक गावी जाण्याचं ठरलं... असं बरंच काही. निघायच्या दोन दिवस आधी मला कळलं की; सहलीला सोबत येणारे सर्व मित्र आता केवळ 'शुभेच्छा'च देणार आहेत. मी एकटाच राहिलो आहे...

झालं... आता माझ्या घरचेही नको म्हणायला लागले. खरं तर आईचं माहेर बेळगाव. त्यामुळे आमच्या सायकल प्रवासाचा मार्ग तिच्या चांगल्याच परिचयाचा; पण ही सगळी परिस्थिती बघून तिलाही आता खंबाटकीचा घाट अधिकच वळणावळणाचा वाटू लागला.

'एकट्याने कुठं एवढ्या लांबवर जायचं असतं का, असं कर अजून थोड्या वर्षांनी गाडीवरच जा; नाही तर मे

महिन्यात नवीन सायकल घेऊन देतो, तेव्हा जा...' असे वेगवेगळे प्रस्ताव माझ्यासमोर येऊ लागले. माझा निर्धार मात्र पक्का होता. मी घरच्यांनाही तो पाठ वाचून दाखवला अन् 'मी चाललोय', असं जरा मोठ्यानंच सांगितलं.

निघायच्या आदल्या दिवशी सायकलीचे मला अनावश्यक वाटणारे भाग मी काढून टाकले. अगदी चेनकव्हरपासून ते मडगार्डपर्यंत ! त्यामुळे सायकल बरीच हलकी झाली. पुण्यातील व साताऱ्यातील माझ्या काकांना फोन करून माझं नियोजन कळवलं. मोठ्या उत्साहाने माझी सगळी तयारी चालू होती. तरी एक अनामिक भीतीही मनात दाटून आली होती; हेही खरंच.

नियोजनानुसार दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी प्राधिकरणातून प्रवासाला सुरुवात केली. तासाभराने पुण्यातील माझ्या काकांकडे मुक्कामासाठी पोहोचलो. प्राधिकरणापासून पुण्यात येईपर्यंत संथ पडणाऱ्या पावसाने छान सोबत केली. मडगार्ड काढल्यामुळे शर्टाच्या मागच्या बाजूला छानशी नक्षी तयार झाली होती. काकांच्या घरीही, 'ऊगाच वेडेपणा करू नकोस, उद्या साताऱ्याच्याऐवजी घरचाच रस्ता पकड...' अशा शब्दांत माझी समजूत काढण्याचा प्रयत्न झाला. तो अर्थातच निष्फळ ठरला.

दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर उठून, आवरून ठीक ६ वाजता प्रवासाला सुरुवात केली. ध्येय होतं सातारा - ११५ कि.मी. थोड्याच वेळात कात्रजचा घाट लागला. सायकल हातात धरून चालतच घाट चढलो. सकाळच्या प्रसन्न वातावरणामुळे फारसं दमायला झालं नाही. घाट संपल्यावर चहा-बिस्किटांनी पोटपूजा केली. तासाला सुमारे १४ ते १५ कि.मी अंतर कापले जात होते. दमल्यावर रस्त्याच्या कडेला असणाऱ्या कठड्यावर पडून विश्रांती घेत होतो. त्या कठड्यावर पाठ टेकल्यावर जो आनंद व्हायचा ना, त्याचं वर्णन ते काय करू ! सायकल चालवताना एकच धृपद आळवत होतो -

*अकेले है तो क्या गम है*
*चाहे तो हमारे बस में क्या नही...*

काही तासांच्या प्रवासानंतर, 'खंबाटकी घाट सुरू होत आहे,' अशी पाटी वाचली. पाटीवर कुठे-कुठे लिहिलं होतं, 'वाहने सावकाश चालवा.' आम्ही तर आधीच सावकाश झालो होतो. तो घाट बघून तर गतीच थांबायची वेळ आली. सायकलवरून उतरून घाट चालू लागलो. मागून येणाऱ्या प्रत्येक वाहनातील प्रत्येक माणूस मागे वळून-वळून माझ्याकडे बघत होता. बऱ्याच ट्रक चालकांनी तर, 'अरे, बस गाडीत. सायकल टाक मागे,' अशी माझी परीक्षा पाहणारी ऑफर दिली; मोठ्या संयमाने मी त्या सगळ्यांना 'नको' असं उत्तर दिलं. घाटात २ वेळा विश्रांतीसाठी थांबलो. घाम निथळत होता. पाणी संपलं होतं. कडकडून भूक लागली होती. थोडक्यात एकदम 'बूरी हालत' झाली होती. एकदाचा तो घाट संपला अन् उतार लागला, तेव्हा कुठे जीवात जीव आला. घाट संपल्याचा आनंद मोठ्याने ओरडून व्यक्त करावासा वाटला; पण अंगात तेवढीही शक्ती उरली नसल्याचे लक्षात आले. त्यामुळे बेत रहित केला.

बरोब्बर ११ तासांनी म्हणजे सायंकाळी ५ वाजता साताऱ्यात पोहोचलो. साताऱ्यातही माझे काका आहेत. यावेळी काकांकडे नेहमीपेक्षा जरा 'जोरा'तच माझं स्वागत झालं. काकांकडे पोहचल्यावर कडकडीत पाण्याने आंघोळ केली. पोटभर जेवलो अन् भरपूर विश्रांती घेतली. दुसऱ्या दिवशी सायकलला विश्रांती देऊन बसने सज्जनगडावर गेलो. गडावर रामदास स्वामींचे दर्शन घेताना 'ते' ही माझ्याकडे कौतुकाने पाहात आहेत, असं मला आपलं उगीचच वाटलं. सज्जनगड भटकून, प्रसाद घेऊन संध्याकाळी काकांच्या घरी परतलो. नंतर सायकलच्या काही मागण्या पूर्ण केल्या कारण तिला उद्या थेट घर गाठायचं होतं. म्हणजेच १३५ कि.मी.चा प्रवास करायचा होता !

प्रवासाचा शेवटचा दिवस उजाडला. परतीचा प्रवास असल्यामुळे सायकलही जोरात पळत होती. तिच्या विविध प्रकारच्या अवयवातून चित्रविचित्र आवाज येऊ लागले होते; पण सायकलनेही चांगली साथ दिली. कुठेही कसलाही त्रास दिला नाही.

थोड्याच वेळात परत एकदा खंबाटकी घाट लागला. परवाच्या दिवशी 'तो' मला हसत होता. आता माझी वेळ


प्रा.-डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, इंग्लंड

होती. आज मला घाट उतरायचा होता. तेही बिलकूल ब्रेक न दाबता ! सुसाट वेगाने; मोठमोठ्याने ओरडत; वाटेतील प्रत्येक वाहनाला ओव्हरटेक करत खंबाटकी घाट उतरताना जो आनंद मिळाला ना, तो काही औरच ! (त्या आनंदासाठी तो घाट पुन्हा चढून पुन्हा उतरावा असं क्षणभर वाटून गेलं, पण क्षणभरच.)

शिरवळला नाश्ता करून पुढे निघालो. आता पुणे येईपर्यंत कुठं थांबायचं नाही, असं ठरवूनच सायकलवर टांग मारली. हळू वेगाने; पण न थांबता पुणं गाठलं. कात्रजचा घाट उतरतानाही मजा आली. दु. ३ च्या सुमारास पुण्यात पोहोचलो. स्वारगेटला जेवण करून शेवटच्या टप्प्यातला प्रवास सुरू केला. कासारवाडीपासून घरापर्यंत जोरदार पावसाने मला नखशिखान्त न्हाऊ घातलं. सगळा थकवा निघून गेला. चिंब भिजलेल्या अवस्थेत घराच्या दारात उभा राहिलो. अंगातून निथळणारं पाणी कमी होतं की काय, म्हणून आईच्याही डोळ्यांना धार लागली. माझी दृष्ट काढून ओवाळताना माझं लक्ष मात्र तिच्या डोळ्यातल्या निरांजनाकडे होतं.

७२ तासात सुमारे २७० कि.मी. अंतर मी पार केलं होतं. म्हटलं तर तशी छोटीच गोष्ट; पण खूप मोठा आनंद देऊन गेली. खूप काही शिकवून गेली.

नंतर मात्र या सायकल सहलींची मला चटकच लागली. सिंहगड, बनेश्वर, थेऊर, कानिफनाथ, पाबळ, जुन्नर, भीमाशंकर, राजगड, प्रतापगड अशा अनेक ठिकाणी विद्यार्थी -मित्रांसोबत सायकल सहलीला जाऊन आलो. मनसोक्त भटकंतीतील आनंद लुटला.

मग कसला विचार करताय? अंगातली मस्ती, रग जिरवण्याचे हेच तर दिवस... व्हा स्वार सायकलवर अन् करा सफर !

***

**– शिवराज पिंपुडे**
२२५/२७ अ, निगडी प्राधिकरण पुणे 411044
shivraj.pimpude@gmail.com

---

करूया नवं काही...

# दीपमाळ



**साहित्य :-** चिनीमातीचा पाईप, एल आकाराचे हूक, एमसिल, पणत्या, आरसे, मणी, घंटा, सोनेरी फेविक्रिल पावडर, वॉर्निश.

**कृती :-** प्रथम फेविक्रिल पावडरमध्ये वार्निश मिसळून ती पातळ करावी. चिनीमातीचा पाईप घेऊन त्याला सोनेरी रंगाने रंगवावा. त्यानंतर कमीत कमी चार ते पाच तास तो पाईप वाळण्यासाठी ठेवावा. एमसीलचे सारख्या प्रमाणात दोन गोळे एकत्र करून चांगले मळून घ्यावेत. एल हूकच्या मागील बाजूस एमसील लावून त्या एल हूकच्या पट्ट्या चिनीमातीच्या पाईपवर आपल्याला हव्या असलेल्या आकारात चिकटवून घ्याव्यात. नंतर पाईपच्या पृष्ठभागावर चौकोनी गोल आरसे आपल्याला आवडतील तशा आकारात/रचनेत चिकटवून घ्यावेत. पाईपच्या वरच्या बाजूला व खालच्या बाजूस मणी लावून पाईप जास्तीतजास्त आकर्षक करता येईल. अशा प्रकारे सर्व साहित्य चिकटवून झाल्यावर एल हूकच्या बाहेरील टोकावर आपण घेतलेल्या पणत्या एम सीलच्या साहाय्याने चिकटवून घ्या. अशाप्रकारे आपली दीपमाळ लावण्यासाठी तयार झालेली असेल. दिवाळीबरोबरच इतर सणांच्या दिवशी, पाहुणे येणार असतील तेव्हा दारात आपण ही दीपमाळ लावून आपला आनंद व्यक्त करू शकतो. हो नं...?

**– माधुरी अरणकल्ले**
१७९- दत्त निवास, पाचतारानगर, आकुर्डी, पुणे 411035



पाहा... नॅशनल वॉर म्युझियम - पुणे

# प्रकल्पांची कमाल, शिकण्यातली धमाल

## प्रकल्प स्पर्धा २०११-१२

'प्रकल्पांची कमाल, शिकण्यातली धमाल' ही लेखमाला सौर ज्येष्ठ अंकापासून प्रकाशित होत आहे. या लेखमालेतील लेख वाचून तुम्हालाही 'मि. उचापते' व्हायला नक्की आवडणार आहे, याची आम्हाला खात्री आहे. आणि म्हणूनच तुमच्यातल्या मि. उचापतेंना योग्य व्यासपीठ/दिशा मिळण्यासाठीच तर ही प्रकल्प स्पर्धा आम्ही आयोजित करत आहोत. तुम्हाला वेगवेगळ्या टप्प्यांवर जी मदत लागेल ती द्यायलाही आम्ही तयार आहोत. मग होणार ना जास्तीत जास्त संख्यने या स्पर्धेत सहभागी?

## स्पर्धेचे नियम व स्वरूप

* प्रकल्प स्पर्धा इ. ८ वी ते १० च्या विद्यार्थ्यांसाठी आहे.
* या स्पर्धेत ३ ते ५ जणांच्या गटानेच सहभागी व्हायचे आहे. स्पर्धेचे नोंदणी शुल्क रु. १००/- आहे. किमान गुणवत्तेच्या वर असणाऱ्या सर्व प्रकल्प गटांना त्यांचे नोंदणी शुल्क परत मिळेल.
* इच्छुक स्पर्धकांनी स्पर्धेच्या नोंदणीसाठीचा अर्ज www. chhatraprabodhan.org या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा. नोंदणी शुल्काच्या डिमांड ड्राफ्टसह अर्ज १५ ऑगस्टपर्यंत 'छात्र प्रबोधन'च्या पत्त्यावर पाठवून द्यावा.
* प्रकल्प वृत्त २० जानेवारी २०१२ पर्यंत सादर करायचे आहे.
* प्रकल्पाची प्रक्रिया अधिकाधिक नेमकी/शास्त्रीय करण्याच्या दृष्टीने किमान २ वेळा (साधारण सप्टेंबर व नोव्हेंबर महिन्यात) तुमच्या प्रकल्पाच्या मध्यांतर टप्प्याचा अहवाल तुम्ही पाठविणे अपेक्षित आहे. त्याचा आराखडा 'छात्र प्रबोधन'च्या संकतस्थळावर दिला जाईल.
* पुढील पानांवर स्पर्धेसाठी काही विषय दिले आहेत. त्यापैकी कुठल्याही एका विषयावर एका गटाला प्रकल्प करता येईल. याशिवाय वेगळ्या विषयावर प्रकल्प करावयाचा असल्यास दूरभाष करून पूर्वसंमती घेणे आवश्यक.
* बक्षिसे - पहिले बक्षीस रु. १५००/- दुसरे बक्षीस - रु. ११००/- तिसरे बक्षीस - रु. ७५०/- विशेष गुणवत्ता प्राप्त सर्व गटांना रु. ४००/- चे उत्तेजनार्थ बक्षीस.
* गटातला एक जण तरी 'छात्र प्रबोधन'चा सभासद असणे गरजेचे आहे. (इतरांना स्पर्धेत सहभागी व्हायचे असेल तर त्यांनी लगेच वार्षिक वर्गणी रु. १८०/- भरून वर्गणीदार व्हावे. प्रकल्प लेखमाला सुरू झाल्यापासूनचे अंक त्यांना पाठविण्यात येतील.)
* प्रकल्प स्पर्धेसाठी मार्गदर्शक अशी प्रकल्प लेखमाला, प्रकल्प विशेषांक प्रकाशित होणार आहे. शिवाय स्पर्धेसाठी नावनोंदणी झाल्यावर तज्ज्ञ व्यक्तींचे दूरभाष क्रमांक कळवले जातील. त्यांच्याशी दूरभाष वरून तुमच्या शंकांचे निरसन तुम्ही करून घेऊ शकाल.
* स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला जोडून दोन दिवसांची भरगच्च कार्यशाळा योजली जाईल. या कार्यशाळेत तज्ज्ञांचे मार्गदर्शन, प्रकल्प भेटी, मान्यवरांशी थेट संवाद, प्रकल्पांचे सादरीकरण इ. गोष्टी असतील. बक्षीस विजेत्या संघांसाठी ही कार्यशाळा मोफत असेल तर विशेष गुणवत्ता प्राप्त प्रकल्पकर्त्यांना शुल्कात विशेष सवलत असेल.
* स्पर्धेचे अन्य तपशील तुमची नावनोंदणी झाल्यावर वेळोवेळी ई-मेल द्वारे तुम्हाला कळविण्यात येतील.



प्रायोजक - मिनीलेक (इंडिया) पिरंगुट, पुणे

## प्रकल्प विषय

* **विविध प्रकारचे साबण/डिटर्जंट्स यांचा तुलनात्मक अभ्यास** *(संभाव्य घटक : विविध प्रकारचे डाग, वेगवेगळे कापड प्रकार, डाग साफ करण्याच्या पद्धती, वापरले जाणारे इतर घटक उदा. पाणी इ.)*
* **प्रकाशाकडे आकर्षित होणाऱ्या किटकांचा अभ्यास** *(संभाव्य घटक : वेगवेगळ्या रंगाचा प्रकाश, वेगवेगळे प्रकाश स्रोत, विविध हवामान व ऋतुमान, दिवसाच्या विविध वेळा, विविध ठिकाणे इ.)*
* **विविध ढिगांच्या रचनेचा भौतिकशास्त्रीय अभ्यास** *(संभाव्य घटक : वेगवेगळ्या पदार्थांचा ढीग, ढिगाची उंची, त्याचा घेर/क्षेत्रफळ इ., त्या ढिगावर तो पदार्थ टाकतानाची उंची, पदार्थाचे विविध भौतिक गुणधर्म उदा. आकारमान, वस्तुमान, घनता इ., ढीग रचण्यासाठी विविध पृष्ठभाग, सपाट पृष्ठभाग व उतारांवरील ढीग इ.)*
* **पॅराशूटचा अभ्यास** *(संभाव्य घटक : पॅराशूटमधील छत्रीचे - घेराचे क्षेत्रफळ, दोऱ्याची लांबी, छत्रीच्या कापडाचा प्रकार, लावलेले वस्तुमान इ.)*
* **चेंडूच्या टप्प्यांचा (bounce) अभ्यास** *(संभाव्य घटक : चेंडूचे विविध प्रकार, चेंडूमधील हवेचा दाब, चेंडूचे भौतिक गुणधर्म उदा. आकारमान, वस्तुमान, घनता, वजन इ., टप्पे पाडण्यासाठी वापरला जाणारा पृष्ठभाग इ.)*
* **आपल्या परिसरातील फळझाडे व ती फळे खाणारे पक्षी/इतर प्राणी यांच्यातील परस्परसंबंधांचा अभ्यास** *(संभाव्य घटक : फळझाडांचे विविध प्रकार, त्यावर पोसणारे पक्षी/इतर प्राणी यांची विविधता/वारंवारिता, दिवसाच्या ठरावीक वेळेचा त्यावर होणारा परिणाम, फळांची संख्या, ऋतू, हवामान इ.)*
* **भात शिजविण्याच्या प्रक्रियेचा अभ्यास** *(संभाव्य घटक : भाताच्या विविध जाती, प्रकार, शिजवण्याच्या विविध पद्धती, शिजवण्यासाठी लागणारा वेळ इ.)*
* **रस्त्यावर होणाऱ्या गर्दीचा अभ्यास** *(संभाव्य घटक : शहर/गावाची प्रमुख ठिकाणे, चौक इ. ,दिवसाच्या वेगवेगळ्या वेळा, मुख्य शहर/गावापासून रस्त्याचे अंतर, सण/बाजार/सार्वजनिक सुट्टी/उत्सव इ. वेळी होणारा बदल, येणाऱ्या समस्या, शहर/गावातील रहदारीचा ताळमेळ, रस्त्यांमधील विविध अडथळे इ.)*
* **मराठीशिवाय अन्य मातृभाषा असलेल्या व्यक्तींचा मराठी बोलण्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास** *(संभाव्य घटक : विविध मातृभाषा बोलणारे लोक, त्यांचे शिक्षण/व्यवसाय/भौगोलिक स्थान/वय/लिंग इ. मुळे होणारा परिणाम.)*
* **गप्पी मासे व डास या दोहोंच्या संख्येचा परस्परांवरील होणाऱ्या परिणामांचा अभ्यास** *(संभाव्य घटक : गप्पी मासे व डास यांची संख्या, त्यांच्या पुनरुत्पादनास लागणारा वेळ, पाण्याचे गुणधर्म उदा : पाण्याचा खारेपणा, घनता, आकारमान, डबक्यातील/नदीतील/तळ्यातील पाणी इ.)*
* **विविध समाजगटांचा आरोग्य/शिक्षण यातील परिस्थितीचा सर्वेक्षण करून तुलनात्मक अभ्यास** *(संभाव्य घटक: कुटुंब, आर्थिक उत्पन्न, होणारा खर्च, वय, व्यवसाय, होणारे आजार इ. मुद्द्यांच्या आधारे प्रश्नावली तयार करून सर्वेक्षण करणे.)*
* **गाव/शहरांमधील प्रेक्षणीय/पर्यटन स्थळे/सण उत्सव इ. चा व्यवसाय उत्पत्तीवर व परिणामी अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास.**

वरील विषयांबाबत अधिक स्पष्टता / नेमकेपणा हवा असल्यास अथवा वरील विषयांशिवाय अन्य विषयांचा अभ्यास करून प्रकल्प करू इच्छित असल्यास त्यांच्या संमतीसाठीही खालील दूरभाष क्रमांकावर संपर्क साधावा.

**नचिकेत - ९४०४२२५३७८ , आदित्य - ९४२१०५८४५८,**
**प्रणव - ९६२३१७६७४०**

## ज... जोडीकार्याचा !

**'छात्र प्रबोधन'च्या सौर चैत्र अंकातील आवाहनानुसार जोडीकार्यात पुण्यातील व पुण्याबाहेरील एकंदर तीस जोड्या उत्साहाने सहभागी झाल्या होत्या. वाचूया जोडीकार्याबद्दलचे काही जोड्यांचे बोलके अनुभव...**



'छात्र प्रबोधन' च्या सौर चैत्र अंकातील आवाहनानुसार परीक्षा चालू असतानाच सुट्टीत हा उपक्रम करण्याचे आम्ही निश्चित केले. परीक्षा झाल्यावर या उपक्रमाबाबतच्या शंकांचे निरसन महेन्द्रभाईंबराबेर दूरभाषवरून झाले.

सर्वात प्रथम महेन्द्रभाईंनी **पुलाची उंची मोजण्याचे काम** दिले. सुरुवातीला चुकत-माकत मग पालकांच्या मदतीने आम्ही हे पहिले जोडीकार्य पूर्ण केलं.

नंतर जे काम मिळाले ते या पहिल्या कामाच्या तुलनेत जरा सोपे वाटले. **घरोघरी जाऊन ज्यांच्याकडे विविध वाद्ये आहे अशा लोकांबद्दल माहिती मिळवायची होती.** या कामात आमच्या गायन शिक्षिका खराडेबाई यांची खूप मदत झाली. हे काम आम्ही उत्साहाने पूर्ण केलं.

त्यानंतर **बस स्टँडवर भाजलेले शेंगदाणे विकण्याचे काम** करायचे होते. हे काम ऐकल्यावर आम्हाला खूपच टेन्शन आलं; पण गौरवच्या आजीच्या मदतीने आम्ही स्वत: शेंगदाणे भाजले व ते स्टँडवर जाऊन विकले. त्यातून रु. ३१/- इतका नफा झाल्यावर आम्हाला फारच आनंद झाला.

दरवेळी नेमून दिलेलं जोडीकार्य करून झालं की, पुढे काय काम करायला मिळणार आहे, याबद्दलचे कुतूहल-उत्सुकता शिगेला पोहोचलेली असायची. आता आम्हाला कोणत्याही एका **चित्रपटगृहाच्या मालकाची मुलाखत** घ्यायची होती. तेथील काम कसे चालते याची माहितीसुद्धा मिळवायची होती. अशा कामांमुळे वेगवेगळ्या लोकांशी आमच्या ओळखी होत होत्या. तांत्रिक माहिती मिळत होती. आमच्या सामान्य ज्ञानात भर पडत होती. त्यानंतरचे काम **झाडाच्या नावाची पाटी झाडांवर लावण्याचे होते.** अशा तऱ्हेने १५ अनोळखी व ५ ओळखीच्या झाडांना पाट्या लावून झाल्या. आपल्या परिसरातील बागेची साफसफाई स्वत:च केल्यावर ती बाग अधिकच सुंदर दिसू लागते, याचा प्रत्यय **बागेच्या साफसफाईचे काम** पूर्ण करून मिळाला.

खरंतर प्रत्येक काम करताना खूप काही शिकायला मिळालं. वेगवेगळे अनुभव येत होते. काम पूर्ण केल्याचा आनंद मिळत होता. आमचे कौतुकदेखील होत होतं. तरीही झोपडपट्टीत जाऊन त्या लोकांची माहिती गोळा करण्याचे काम आम्हाला पूर्ण करता आले नाही, याची रुखरूखही वाटत होती. त्या लोकांची आणि आमची भाषा वेगळी असल्यामुळे हे काम अर्धवट सोडावे लागले. जोडीकार्याचा पुढील टप्पा म्हणून आमच्या **कामवाल्या मावशींच्या घरी जाऊन त्यांची व त्यांच्या कुटुंबाची माहिती - ओळख** करून घेतली. त्यातूनच आपल्या आजूबाजूला काय घडते? लोकं कशा परिस्थितीत राहतात? परिस्थितीशी दोन हात करत कसे जगतात, हे जवळून पाहता आले.

ही सर्व जोडीकार्ये पूर्ण करताना आम्हाला वेळोवेळी महेन्द्रभाईंचे मार्गदर्शन मिळत होते. तसेच घरातल्या सर्वांचा खूपच पाठिंबा आणि मदतही मिळाली.

या उपक्रमातून आम्हाला जगाकडे बघण्याची एक नवीनच दृष्टी मिळाली. त्यासाठी 'छात्र प्रबोधन'चे खूप आभारी आहोत.

**– चि. हृषिकेश जैन, चि. गौरव गोल्हार**
इ. ९वी, चाळीसगाव


**प्रायोजक - श्री. अच्युत श्रीपाद दामले, सांगली**

## अनुभव शिक्षणाची सुवर्णसंधी-जोडीकार्य

सुट्टीप्रमाणेच वर्षभर ही योजना चालू असणार आहे. सोबतचे हे अनुभव वाचून, तुम्हीही या जोडीकार्यात सहभागी होणार ना? तर मग ९४०४२२४७०५ क्रमांकावर SMS करा. त्यात आपले नाव-गाव, इयत्ता आणि ई-मेल पत्ता कळवा. म्हणजे सविस्तर माहितीपत्रक तुम्हाला ई-मेल द्वारा पाठवले जाईल. काही जोड्यांनी तर कामाला सुरुवात केलीसुद्धा! चला तर मग, आम्ही तुमच्या SMS ची वाट पाहतोय...

परीक्षा संपल्या आणि दोन महिन्याच्या लांबलचक सुट्टीचं करायचं काय, हा यक्षप्रश्न माझ्यापुढे 'आ' वासून उभा राहिला. 'छात्र प्रबोधनचे' संपादकीय वाचून आणि ऋचाताईशी जोडी ठरवून आम्ही महेन्द्रकाकांना फोन केला. त्यांनी आमच्या जोडीची नोंद केली आणि आम्हाला पहिलं कार्य दिलं -

**'तुमच्या जवळपासच्या पाच नगरसेवकांची दहा-दहा ओळीत माहिती लिहायची** आणि एका महिला नगसेविकेची पंधरा ते वीस प्रश्नांची **मुलाखत** घ्यायची.'

हे काम कळताच आम्ही नगरसेवकांना प्रत्यक्ष भेटून किंवा फोनवरच प्रश्न विचारण्याचं ठरवलं. त्यांना विचारण्याचे प्रश्न तयार केले. नगरसेविकेच्या मुलाखतीचे प्रश्न वेगळे काढले. त्याचदिवशी आमच्या वॉर्डच्या नगरसेवकांच्या घरी जाऊन त्यांना भेटून, त्यांची माहिती घेऊन परतलो. त्या आणि दुसऱ्या दिवशीही काही नगसेवकांना फोन केले. 'आत्ता गावात नाही', 'थोड्या वेळाने फोन करा' अशी काही 'टिपिकल' उत्तरेही मिळाली. काहींनी मात्र आस्थेने नीट उत्तरेही दिली.

नगरसेवकांना विचारण्याच्या दहा प्रश्नांमध्ये 'सीमाप्रश्नाबद्दल आपलं मत काय?' हा एक चिमटा घेणारा प्रश्न आम्ही मुद्दामच घातला होता. शिवाय या प्रश्नांत आणि मुलाखतीतल्या प्रश्नांत 'आपला आवडता राजकारणी कोण?' आणि 'आपली महत्त्वाकांक्षा काय?' हे प्रश्न सारखेच ठेवले होते. पहिल्या प्रश्नाच्यावेळी एक-दोघांनी मोठी चमत्कारिक उत्तरं दिली. दुसऱ्या प्रश्नाच्यावेळी तर काहींच्या 'पंतप्रधान होणे', 'आमदार होणे', अशा मजेदार भराऱ्या पाहून, ऐकून मौज वाटली; पण 'समाजसेवा करावी', 'माझ्या वॉर्डमधील लोकांना सगळ्या सुखसोयी उपलब्ध करून द्याव्यात, असे विचार ऐकून मनाला बरंही वाटलं.

'पाच नगरसेवक' ही मोहीम फत्ते झाली. आता शोध सुरू झाला एका महिला नगरसेविकेचा! 'घरी पाहुणे आलेत', 'आता वेळ नाही,' अशा उत्तरांना सामोरं जात जात वेळ पुढं-मागं करत एकदाचे आम्ही बसने मुलाखत ठरलेल्या नगरसेविकेकडे गेलो. ऋचाताई तर असा स्वतंत्र (आई-बाबांशिवाय) बसप्रवास पहिल्यांदाच करत होती. बेळगावची पूर्ण माहिती आम्हाला दोघींनाही नव्हती. त्यामुळे विचारत विचारत आम्ही निघालो. एकाने तर चुकून आम्हाला वेगळाच रस्ता दाखवला आणि पार दुसऱ्या टोकालाच पोहोचवलं. शेवटी एकदाच्या आम्ही त्यांच्या घरी पोहोचलो. मुलाखत अतिशय चांगली झाली. झाली नाही, दिली !

हे आमचं पहिलं कार्य झालं... असंच दुसरं कार्य झालं... तिसरं... चौथं... असं होता होता सातही कामं आम्ही पूर्ण केली. त्यामुळे धमाल अशा साहस सहलीत आम्ही सहभागी झालो.

***

**– कु. अंकिता आपटे,** इ. १०वी,
बालिका आदर्श विद्यालय, बेळगांव

---

सुट्टीत काहीतरी नवीन व चांगले करावेसे वाटत असतानाच 'छात्र प्रबोधन' मधला जोडीकार्याचा उपक्रम वाचण्यात आला. तेव्हाच जोडीकार्य करायचं मी व प्रज्ञानं पक्कं केलं. महेन्द्रभाईंशी चर्चा करून त्यांनी आम्हाला एक-एक जोडीकार्य नेमून दिले. ते पूर्ण केल्यानंतरच पुढचे काम दिले जाई.

आम्हाला सर्वात जास्त आवडलेले जोडीकार्य म्हणजे **पुलाची उंची मोजणे**. या कार्यामध्ये आम्हाला थोडे डोके वापरून उंची मोजावी लागणार होती. ते काम करताना दोरी पट्टीला बांधणे गरजेचे होते, तसेच पट्टीचे वजनही योग्य असणे गरजेचे होते. त्याकरता स्टीलची पट्टी आम्ही वापरली. आता पुलाचे ५ समान भाग करणे गरजेचे होते. पुलाला जिथे जिथे आधार दिला गेला होता तिथून तिथून आम्ही उंची मोजली. उंची मोजलेल्या दोऱ्याची लांबी त्याच्या किती पट आहे, यावरून त्या त्या ठिकाणची उंची मोजली. नंतर


ऐका... देहाची तिजोरी - जगदीश खेबूडकर

सर्व ठिकाणच्या उंचीची सरासरी काढून पुलाची उंची ठरवली. हे करताना खूप मजा आली. आम्ही ज्या पद्धतीने काम करत होतो ते पाहून बरेच लोक थांबून आमची विचारपूस करत होते. त्यांना उत्तरे देताना मजा आली.

नंतरचे जे जोडीकार्य होते, ते म्हणजे **स्वारगेटच्या बस स्टँडवर भाजलेले शेंगदाणे विकणे.** आम्ही याआधी बरेचदा स्वारगेटला गेलो होतो; पण असे काम कधी केले नव्हते. त्यामुळे आम्हाला हा अनुभव पूर्णपणे नवीन होता. इथे आल्यावर आम्हाला समजले की, दाणे विकण्यासाठी परवाना लागतो. त्यात आणखी भर म्हणजे आमच्या पेहेरावाकडे बघून प्रवासी आमचे दाणे विकतच घेत नव्हते. मग आपण जेव्हा प्रवासी असतो व विक्रेत्यांकडे दुर्लक्ष करतो, तेव्हा त्यांना कसं वाटत असेल, याचा अनुभव आला. मग आम्ही दाणे दुकानात विकायचा निर्णय घेतला. तिकडे एका काकांनी आम्हाला बरीच मदत केली. आमचे दाणे विकत घेतले. तसेच त्यांनी आम्हाला नफ्याचे पैसे कसे मोजायचे तेही सांगितले. हे काम करताना आम्हांला बरेच काही शिकायला मिळाले.

त्यानंतरचे काम म्हणजे **वेगवेगळ्या भिकाऱ्यांची मुलाखत घेणे.** आम्ही पहिल्या दिवशी सगळीकडे फिरून आलो; पण आम्हाला एकही भिकारी भेटला नाही. मग आम्ही चतुर्थीच्या दिवशी गणपती मंदिराच्या बाहेर थांबलो; तेव्हा मात्र भिकारी दिसले. प्रथम जेव्हा आम्ही त्यांना उभ्या उभ्या प्रश्न विचारले तेव्हा त्यांनी काहीच प्रतिसाद दिला नाही; पण आम्ही जेव्हा त्यांच्यासारखे जमिनीवर बसलो तेव्हा मात्र ते काही प्रमाणात बोलते झाले. त्यांनी त्यांच्या अडचणी सांगितल्या. त्यातले काही कुष्ठरोगी होते. ते बरे झाले होते; पण त्यांच्या घरातील लोक त्यांना परत घरी घेत नव्हते. आम्हाला त्यांच्या अशा अनेक अडचणी कळल्या. त्यांना समजावण्यापलीकडे व थोडे पैसे देण्यापलीकडे आम्ही काहीच करू शकत नव्हतो. त्यांचे प्रश्न कोण ऐकणार? त्यांना मदत कोण करणार? हा आम्हाला पडलेला मोठाच प्रश्न होता.

सर्वच जोडीकार्यातून आम्हाला नवे नवे शिकायला मिळाले. नवीन ओळखी झाल्या. सर्व स्तरांतल्या माणसांचे जीवन थोडक्यात पाहायला मिळाले. याबरोबरच आपण खरंच किती सुखी आहोत हेही लक्षात आले. आपल्याला असणारे दु:ख हे किती नगण्य आहे हेही पटले. आपल्या देशाची प्रगती साधायची असेल तर सर्व स्तरातील लोकांना सोबत घेऊन जावे लागेल, हे जाणवले.

खरंच, या सुट्टीत आम्हाला फार छान उपक्रम करता आला, त्यासाठी 'छात्र प्रबोधन'चे आभार ! यापुढेही 'छात्र प्रबोधन'च्या विविध उपक्रमात सहभागी व्हायला आम्हाला नक्कीच आवडेल.


***

**– आर्या बर्वे,** इ. ९वी
ज्ञान प्रबोधिनी, प्रशाला पुणे


*** 'छात्र प्रबोधन'च्या वैशिष्ट्यपूर्ण पुस्तकाचे पुनर्मुद्रण ***

**गंध मोहवी काव्याचा : भाग १ व २ – लेखिका : शैलजा देशमुख**

**पृष्ठसंख्या : ८८ प्रत्येकी    किंमत : ₹ ७०/– प्रत्येकी**



केशवसुतांपासून १००–१२५ वर्षांचा काळ हा मराठी कवितेच्या इतिहासातील एक उज्ज्वल कालखंड ! त्यातील महत्त्वाच्या २० प्रातिनिधिक कवींच्या कवितांचा आस्वादात्मक परिचय 'गंध मोहवी काव्याचा'च्या दोन भागात करून दिला आहे. त्यामध्ये केशवसुतांपासून ते आजच्या कवींपर्यंत वैशिष्ट्यपूर्ण कवींची निवड या लेखांसाठी केली आहे. काव्यरुची निर्माण व्हावी व कविता अभ्यासताना काव्यवैशिष्ट्ये समजावीत यासाठी ही पुस्तके निश्चितच उपयुक्त ठरतील.

**छात्र प्रबोधनच्या 'e' – पुस्तकांसाठी अवश्य भेट द्या – Bookganga.com वर**
**'छात्र प्रबोधन'चे दशवार्षिक संकलन असलेली DVD (१२० अंक, ६३२० पाने) फक्त ₹ १००/– मध्ये**




हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९३३, १ जुलै २०११ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.





कै. दिनेश बळवंत बापट स्मरणार्थ । **प्रायोजक - श्री. बळवंत गंगाधर बापट, अंधेरी**

# ‘आकार’ली चित्रं !

तुम्हीही अशा विविध भौमितिक आकारातील चित्रं पाठवणार ना ‘छात्र प्रबोधन’कडे...










प्रकाशचित्र पाहून काही सुचतंय?... शीर्षक, कविता, ललित, कथा...

सौर आषाढ, शके १९३३/ जुलै २०११, पंजीकृत नियतकालिक (Registered Newspaper)
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
L-2/RNP/PNW/M/94/2009-2011, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक License to post without prepayment of postage LWP No. L-172



## तनूमनात...

तनूमनात एक ध्यान प्रिय महान हिंदुस्थान
हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान ।। ध्रु. ।।

ऋषी मुनी तपोनिधी कितीक येथ जाहले
दिव्यदृष्टि-चिंतकांनी विश्वगूढ भेदिले
गुरुपदीच शोभतो प्रिय महान हिंदुस्थान ।। १ ।।

जाहली प्रसन्न येथ जान्हवी भगीरथा
सिद्ध सूर्य कोंडण्यास ब्रह्मपुत्र सर्वथा
यत्न हाच मंत्र देइ प्रिय महान हिंदुस्थान ।। २ ।।

सरेल दैन्य येथले सुबुद्ध कष्ट सिंचता
बहरतील वैभवे ध्यासबीज पेरता
शतयुगे अदीन हा प्रिय महान हिंदुस्थान ।। ३ ।।

असंख्य ज्योति चेतवून एक आरती तुझी
असंख्य सूर मेळवून एक अर्चना तुझी
हृदयपुष्प वाहिले पदी तुझ्याच हे महान ।। ४ ।।

**सौर दिनदर्शिका**
**शके १९३३**

| जुलै २०११ | | आषाढ / श्रावण |
|---|---|---|
| शु. | 1 | १० |
| श. | 2 | ११ |
| र. | 3 | १२ |
| सो. | 4 | १३ |
| मं. | 5 | १४ |
| बु. | 6 | १५ |
| गु. | 7 | १६ |
| शु. | 8 | १७ |
| श. | 9 | १८ |
| र. | 10 | १९ |
| सो. | 11 | २० |
| मं. | 12 | २१ |
| बु. | 13 | २२ |
| गु. | 14 | २३ |
| शु. | 15 | २४ |
| श. | 16 | २५ |
| र. | 17 | २६ |
| सो. | 18 | २७ |
| मं. | 19 | २८ |
| बु. | 20 | २९ |
| गु. | 21 | ३० |
| शु. | 22 | ३१ |
| श. | 23 | श्रा.१ |
| र. | 24 | २ |
| सो. | 25 | ३ |
| मं. | 26 | ४ |
| बु. | 27 | ५ |
| गु. | 28 | ६ |
| शु. | 29 | ७ |
| श. | 30 | ८ |
| र. | 31 | ९ |

वरील गीत 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर जरूर ऐका.

पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 11-10 / July 11 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा.

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
jpchhatra@rediffmail.com

**या अंकाची किंमत : ₹ १५/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-**
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० आषाढ, शके १९३३
१ जुलै २०११

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -